10-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

MSS/ 12:00

10-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

MSS/ SBT/ MHM/ 12:00

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी**..: खाजगी शाळांना दिलेल्या परवानगीच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय

**मु.शी**.: खाजगी शाळांना दिलेल्या परवानगीच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयासंबंध माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन

प्रा. वसंत पुरके : माननीय उपसभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

याचिका क्रमांक 2897/2006 मध्ये खाजगी शाळा सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेल्या प्रकरणी दिनांक 7 जुलै, 2006 रोजी. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूरने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात मी खालीलप्रमाणे निवेदन करीत आहे :-

1. शालेय शिक्षण मंत्री म्हणून खाजगी संस्थांना शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेताना माझ्याकडे सादर करण्यात आलेल्या कोणत्याही संचिकेतील टिपणीमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 11.4.2000 व दिनांक 3.11.2004 च्या आदेशाचा साधा उल्लेख सुध्दा करण्यात आला नव्हता,
2. माझ्या समोर सादर केलेल्या प्रस्तावात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा उल्लेख असलेला एकमेव शासन निर्णय ठेवण्यात आला होता. सदरचा शासन निर्णय. दिनांक 19 जून 2004चा असून, त्या शासन निर्णयाचे मी तंतोतंत पालन केले आहे.
3. शालेय शिक्षण मंत्री म्हणून माझ्या कारकीर्दीत शाळा परवानगीचा एकही धोरणात्मक शासन निर्णय निर्गमित झाला नाही.
4. संदर्भीय याचिकेच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करण्याची कृती माझ्या हातून घडली नाही, हे सप्रमाण सिध्द करणे मला शक्य असूनही विभागाचा कुटुंबप्रमुख म्हणून वैयक्तिकरित्या माझ्या हातून न घडलेली चूक मी मान्य केली व याचिका क्रमांक 1773 व 1990 मधील न्यायालयाच्या आदेशानुसार 6 महिन्याच्या आत कार्यवाही पूर्ण करण्याबाबत मी विधीज्ञांमार्फत न्यायालयास कळविले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

(प्रा. वसंत पुरके...

5. मा. उच्च न्यायालयाचे माझ्या कृतीतून समाधान झाले असले तरी न्यायालयाच्या आदेशाचा अनादर करण्याची कृती ज्यांच्या हातून घडली असेल त्या सर्व संबंधितांविरुध्द मी नियमाचे अधीन राहून योग्य ती कार्यवाही करीन त्याकरिता आवश्यकता भासल्यास चौकशी समितीचे गठन करीन.

श्री. नितीन गडकरी : माननीय उपसभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात निवेदन करीत आहेत. हा उच्च न्यायालयाचा अवमान आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय मंत्री महोदय या सभागृहामध्ये निवेदन करीत आहेत. निवेदन करण्याचा त्यांचा अधिकार आहे. हे निवेदन रेकॉर्डवर येणार आहे. निवेदन झाल्यानंतर माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री. नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदय निवेदन करीत आहेत त्याबद्दल माझा आक्षेप नाही. माझा आक्षेप वैधानिक आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर त्या प्रकरणाशी माझा कसा संबंध येत नाही हे याठिकाणी व्यक्त करणे बरोबर नाही. माननीय मंत्री महोदय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतात. उच्च न्यायालयाच्या निर्णयावर या ठिकाणी मल्लिनाथी होणार असेल तर ते योग्य नाही.

प्रा. वसंत पुरके : झालेली चूक मान्य केलेली आहे..

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : नियम 47 अन्वये माननीय मंत्री महोदयांना निवेदन करता येते.

**उपसभापती** : नियम 47 पुढील प्रमाणे आहे. "कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी, सभापतींच्या परवानगीने वैयक्तिक स्पष्टीकरण - मग त्यासंबंधीचा प्रश्न त्यावेळी विधानपरिषदेपुढे नसला, तरीही - करता येईल मात्र असे करताना तो कोणताही विवाद्य विषय पुढे आणणार नाही, तसेच, अशा स्पष्टीकरणावर कोणतीही चर्चा करण्याला परवानगी देता येणार नाही."

श्री. नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदय प्रा. वसंत पुरके यांनी निवेदन करण्यास माझा कोणताही प्रत्यवाय नाही. माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करण्यास माननीय उपसभापतींची परवानगी मागितल्या नंतर त्यांना निवेदन करण्याची परवानगी देण्यात आली. त्यासंबंधी माझा कोणताही आक्षेप नाही. अशा प्रकारे निवेदन करण्याचा माननीय मंत्री महोदयांना अधिकार आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.......

मुद्दा फक्त एवढाच आहे की, हायकोर्टाने जो निर्णय दिला, 1459 शाळा मंजूर केल्या त्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा कॅबिनेटच्या परवानगीनंतर दिल्या का हे क्लिअर करावे. म्हणजे पापाचे भागीदार कोण हे बाहेर येईल. हायकोर्टाने जो निर्णय दिला त्या जज्जमेंटची कॉपी माझ्याकडे उपलब्ध आहे. त्याबाबत मी चर्चा करु इच्छित नाही. त्या निर्णयाबाबत सरकारी वकील श्री.मनोहर यांनी कोर्टात सांगितले आहे की, आमचे चुकले, आम्हाला दुरुस्ती करायला संधी द्यावी. त्यामुळे हायकोर्टाने शाळा रद्द केल्या. फक्त मंत्रीमहोदय याठिकाणी जे बोलले, मी हा निर्णय कोणत्या परिस्थितीत घेतला, का घेतला, कशाकरीता घेतला ते रेकॉर्डवर ठेवू नये. हायकोर्टाने जो निर्णय दिला त्याबद्दल पुन्हा ऑर्ग्युमेंट करणे म्हणजे हायकोर्टाच्या निर्णयाची मल्लिनाथी होईल. हायकोर्टाचा अवमान होईल. या निर्णयावर मल्लिनाथी करण्याची गरज नाही. मी काय केले ते योग्य होते हे सांगावयाचे असेल तर सुप्रीम कोर्टात सांगता येईल. याठिकाणी बोलता येणार नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण बोलण्यास परवानगी दिली असल्यामुळे सन्माननीय शिक्षणमंत्री महोदयांचे निवेदन होऊ द्यावे एवढीच माझी विनंती आहे.

श्री.वसंत पुरके : माननीय सभापती महोदय, या याचिकेच्या संदर्भात दिनांक 7 जुलै, 2006 रोजी माननीय उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूरने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात आम्ही निश्चितच बृहत आराखडयाचे तंतोतंत पालन करु आणि दिलेल्या कालावधीत हा बृहत आराखडा सादर करु.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी जे निवेदन सभागृहात जाहीर केले त्याबाबत आपण त्यांना परवानगी दिली होती, आता ही सभागृहाची प्रॉपर्टी झाली असल्यामुळे त्या निवेदनाची प्रत आम्हाला उपलब्ध झाली पाहिजे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, निवेदनाची प्रत उपलब्ध करुन द्यावी असे नियमामध्ये कुठेही उल्लेखिलेले नाही.

**उपसभापती** : माननीय मंत्रीमहोदयांनी केलेल्या निवेदनाच्या प्रती सभागृहाला तातडीने उपलब्ध करुन दिल्या जातील.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, नियमामध्ये असा कुठेही उल्लेख नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण निर्णय दिल्यानंतर सन्माननीय सदस्य त्यावर जे बोलत आहेत हे योग्य नाही.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : जे कायदेशीर आहे ते रेकॉर्डवर आले पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, या सभागृहात अशा प्रकारचे निवेदन जेव्हा जेव्हा झाले तेव्हा तेव्हा निवेदनाच्या प्रती सभागृहात वितरित करण्यात आल्या आहेत. सन्माननीय मंत्री श्री.वसंत पुरके यांनी निवेदन केल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी झालेली आहे. हाऊसची प्रॉपर्टी झालेल्या निवेदनाची लेखी प्रत मागणे हा वैधानिक अधिकार आहे. त्याप्रमाणे आदरणीय रामशास्त्री उपसभापती महोदयांनी उठून निर्णय दिला की, निवेदनाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या जातील. त्यांच्या निर्णयावर आपण पुन्हा बोलून त्यांचा अपमान करीत आहेत. तेव्हा आपण सरकारी वकील नसल्यामुळे ऑर्ग्युमेंट करु नये.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला त्यामध्ये मी हस्तक्षेप करु इच्छित नाही. एखाद्या सन्माननीय सदस्याने किंवा सन्माननीय मंत्रीमहोदयांनी निवेदन केले त्या निवेदनाची प्रत सभागृहास दिली पाहिजे असे नियम 46 किंवा 47 मध्ये कुठेही म्हटलेले नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण या संदर्भात उत्तर देऊन सन्माननीय सदस्यांचे तोंड बंद करावे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे काही वक्तव्य केलेले आहे, त्यामुळे ते खरोखर वकील आहेत का असा आम्हाला प्रश्न पडलेला आहे. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सरकार म्हणून, मंत्री म्हणून नियम 47 प्रमाणे निवेदन केलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, त्यांनी नियम 46 प्रमाणे निवेदन केलेले आहे. परंतु या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जे काही निवेदन केलेले आहे ते मंत्री म्हणून, शासन म्हणून निवेदन केलेले आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी वैयक्ति खुलासा केलेला नाही. सभापती महोदय, शालेय शिक्षणाच्या संदर्भात या सरकारची बेअब्रु झालेली आहे. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी शासन म्हणून जे निवेदन केलेले आहे त्याची प्रत सन्माननीय सदस्यांना मिळणे हा आमचा अधिकार आहे त्यामुळे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जे निवदेन केलेले आहे, त्याची प्रत आम्हा सन्माननीय सदस्यांना मिळाली पाहिजे. तसेच आपण या विषयाच्या संदर्भात निर्णय दिल्यानंतर सुध्दा त्या निर्णयावर बोलणे हे काही बरोबर नाही.

**उपसभापती** : निवेदनाच्या प्रती आम्हाला मिळावयास पाहिजेत अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे. आपण जी मागणी केलेली आहे, तो आपला हक्क आहे. या निवेदनाच्या संदर्भातील प्रती सन्माननीय सदस्यांना एक तासाच्या आत उपलब्ध करुन दिल्या जातील असा मी निर्णय अगोदर सुध्दा दिलेला आहे व आता पुन्हा तोच निर्णय देत आहे. आता सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रस्तावावरील भाषणास सुरुवात करावी.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण एकदा निर्णय दिल्यानंतर आम्हाला तो मान्य असतो परंतु आपण एकदा निर्णय दिल्यानंतर त्यावर पुन्हा मल्लिनाथी करणे हे काही योग्य नाही त्यामुळे आपण सन्माननीय सदस्यांना समज द्यावी. एकदा सभापतींनी निर्णय दिल्यानंतर आपण सर्वांनी तो स्वीकारलाच पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी प्रस्तावावरील आपले विचार व्यक्त करावेत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात शिक्षण क्षेत्रात प्राथमिकपासून पदवीपर्यंत चालू असलेला अभूतपूर्व गोंधळ.

**मु.शी.**: राज्यात शिक्षण क्षेत्रात प्राथमिकपासून पदवीपर्यंत चालू असलेला अभूतपूर्व गोंधळ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ, दिपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, श्रीमती कांता नलावडे, डॉ. नीलम गो-हे, ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेला प्रस्ताव.

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला. .....

श्री. प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, शिक्षणाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. शिक्षणाच्या प्रस्तावावर परवा मी काही मागण्या केल्या होत्या . त्याच्यापुढे जाऊन आज सुध्दा मी शिक्षणाच्या संदर्भात एक मागणी करणार आहे. 30 वर्षापूर्वी मी जेव्हा एसएससीमध्ये होतो तेव्हा मी मुंबईच्या चाळीत राहत होतो. 30 वर्षापूर्वी चाळीत किंवा झापडपट्टीत अभ्यासाची सोय नसल्यामुळे रस्त्यावरील दिव्याखाली विद्यार्थ्यांना अभ्यास ककरावा लागत असे परंतु 30 वर्षे झाली तरी सुध्दा चाळीत किंवा झ ाोपडपट्टीतील मुलांच्या अभ्यासाच्या पध्दतीत काही सुध्दा फरक पडलेला नाही. आज सुध्दा चाळीतील, झोपडपट्टीतील मुलांना रस्त्यावरील दिव्याखाली बसूनच अभ्यास करावा लागत आहे. हे आपल्या आधुनिक महाराष्ट्राला शोभणारे नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी बीडीडी चाळीत फेरफटका मारला तर त्यांना दिसून येईल की, आज सुध्दा रस्त्यावरील एका एका दिव्याखाली 5-5,6-6 मुले अभ्यास करतांना आढळून येतील. 10X10 च्या घरात किंवा कुडाच्या झोपडीत जी मुले शिक्षण घेत आहेत त्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात, अभ्यासाच्या संदर्भात कधी या शासनाने विचार केलेला आहे काय? त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांकडे मागणी आहे की, ज्या ठिकाणी अशा प्रकारे मुले अभ्यास करतात मग ते खेडे असो किंवा चाळ किंवा झोपडपट्टी असो येथील 50-100 मुले एकाच ठिकाणी बसून अभ्यास करु शकतील अशी सोय शासनाने उपलब्ध करुन द्यावी. आजकाल इंटरनॅशनल स्कुलचे पेव फुटलेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी एकदा "इक्वल मंडेल" या इंटरनॅशनल स्कुलमध्ये गेलो होतो तेव्हा त्यांना विचारले की, तुमच्या शाळेची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे.......

फी किती आहे? त्यावर त्यांनी सांगितले की, आमच्या शाळेची फी 10 लाख रुपये आहे. आपण ही जी फी ठरवलेली आहे त्याला आधार काय, ही फी कोण रेग्युलेट करते? यावर त्यांनी उत्तर दिले की, "डिमांड अँड सप्लाय " यावरुनच आमची फी ठरत असते. आज तुम्ही ॲडमिशन घेतले तर आजची फी 10 लाख रुपये आहे आणि जर उद्या ॲडमिशन घेतली तर आमची फी 11 लाख रुपये होऊ शकते.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.जुन्नरे...... 12:15

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी )**

श्री.प्रकाश शेंडगे............

तुम्ही 10 लाख रुपये भरुन आजच ॲडमिशन फिक्स करा नाहीतर उद्या 11-12 लाख रुपये ॲडमिशनसाठी भरावे लागतील. अशाप्रकारे धनधांडग्यांसाठी आरक्षण सुरु ठेवलेले आहे. एकीकडे मागासवर्गीयांसाठी 27 टक्के आरक्षण द्यावे, भटक्या विमुक्त जातीसाठी 12 टक्के आरक्षण द्यावे अशी ओरड सुरु आहे, तर काही शाळांमध्ये धनधांडग्यांसाठी 100 टक्के आरक्षण लागू केलेले आहे. धनधांडग्यांसाठी ज्या शाळा आहेत त्याठिकाणी सुध्दा मागासवर्गीयांसाठी आरक्षण ठेवले पाहिजे आणि त्यांची फी सुध्दा रेग्युलराईज केली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, गुणवत्तेच्या आधारे विनाअनुदानीत शाळांना परवानगी दिली पाहिजे असा उच्च न्यायालयाने आदेश दिला होता. शाळेची गुणवत्ता न पाहता जवळपास दीड हजार शाळांना विनाअनुदानीत तत्वावर मान्यता देण्यात आली म्हणून दोनच दिवसांपूर्वी नागपूरच्या खंडपीठाने महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राचे धिंडवडे काढले आहेत. जर एक विनाअनुदानीत शाळा काढावयाची असेल तर त्यासाठी पाच लाख रुपये देऊन मान्यता मिळवता येते, असा मार्केट रेट सुरु आहे. याठिकाणी जवळपास दीड हजार शाळांना मान्यता मिळालेली आहे. जर या शाळा विनागुणवत्तेच्या आधारावर मंजूर झाल्या असतील तर त्यामध्ये किती भ्रष्टाचार झाला असेल याची कल्पना न केलेली बरी. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाबाबत चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, गेल्या दोन-तीन वर्षापूर्वी काही बेकायदेशीर शाळा सुरु होत्या. त्या शाळांना मान्यता मिळालेली नाही. त्या शाळेतील विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्याची परवानगी देण्यात आली नाही. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थ्याचे वर्ष फुकट जाणार आहे. ज्या मान्यता प्राप्त प्राथमिक शाळा आहेत अशा शाळांतून त्या विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी असे सरकारतर्फे आदेश काढण्यात आलेले आहेत. परंतु अशा बेकायदेशीर माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतून परीक्षा देता येणार नाही असे सांगण्यात आले. तेव्हा माध्यमिक शाळेतील जवळपास 25 हजार विद्यार्थ्यांचे एक वर्ष फुकट जाण्याची वेळ आलेली आहे. तेव्हा सरकारने मान्यता प्राप्त

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे............

नसलेल्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतून परीक्षा देण्याची परवानगी दिली तशी परवानगी मान्यता प्राप्त नसलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात यावी जेणेकरुन 25 हजार विद्यार्थ्यांचे एक वर्ष फुकट जाणार नाही, एवढे विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, शिक्षणक्षेत्रावर उपस्थित झालेल्या चर्चेच्या निमित्ताने बोलत असताना विशेषत: उच्च शिक्षणक्षेत्रात सुरु असलेल्या गोंधळावर मी बोलणार आहे. मी अगदी मुद्देसूद बोलणार आहे.

सभापती महोदय, उच्च शिक्षण देणाची जबाबदारी ज्या विद्यापीठांवर असते त्या विद्यापीठांत सध्या गोंधळ सुरु आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठात गेलो तरी त्या विद्यापीठाने केलेल्या भ्रष्टाचारासंबंधी वर्तमानपत्रात रकान्याच्या रकाने भरुन येत आहेत. मॅनेजमेंट कॉन्सिल असो, ॲकेडमी कौन्सिल असो त्याठिकाण 90 टक्के चर्चा ही गेल्या वर्षभरात उच्च पदस्थांनी केलेल्या भ्रष्टाचारासंबंधी असते. नोकर भरतीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चर्चा असते. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या झालेल्या नोकर भरतीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चर्चा सुरु असते असे आपल्या लक्षात येईल.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 12:20

श्री.श्रीकांत जोशी....

सभापती महोदय, संभाजी नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये काही दिवसांपूर्वी नोकर भरती झाली, त्यामध्ये प्रचंड प्रमाणात गोंधळ झाला. त्याबाबत विद्यार्थ्यांनी आंदोलने केली. त्याठिकाणी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणाऱ्या घटना घडल्या. खरे म्हणजे, महाराष्ट्र सरकारमधील एका व्यक्तीला जरी थोडीशी जाण असेल व त्यांच्यामध्ये थोडीशी जरी संवेदनशीलता शिल्लक असेल तर.... अक्षरश: अंगाला लाहया फुटाव्यात अशा पध्दतीचा नीचपणा या भरतीमध्ये झालेला आहे. श्री.कृष्णा भोगे या तत्पर व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यास त्याठिकाणच्या कुलगुरु पदाचा चार्ज देण्यात आला होता. त्याठिकाणी ते अतिशय प्रामाणिकपणे काम करीत होते. त्याठिकाणी जवळपास 100 च्या आसपास जागांसाठी भरती होत होती, जवळपास 27 हजार ॲप्लीकेशन्स आले होते. याबाबतीत त्यांनी एक लेखी परीक्षा घेण्याचे ठरविले होते. त्यानंतर एकास तीन अशा पध्दतीच्या निकषानुसार तोंडी परीक्षा घेण्याचे त्यांनी आदेश काढले. परंतु याबाबतीत सरकारच्या निर्लज्जपणाचा कळस असा सुरु झाला की, तेथील मॅनेजमेंट कौन्सिलने दबाव आणून मुलाखतीचे कॉल सुटण्यासाठी श्री.भोगे जाऊन नवीन कुलगुरु येईपर्यंत कॉल सोडण्यात आले नाहीत व एकास तीन अशा पध्दतीचा निकष असताना मॅनेजमेंटने एक वेगळी बैठक घेऊन जून्या कुलगुरुंचे निकष बदलले व एकास दहापर्यंचे निकष केले. मी समजलो असतो इथपर्यंतच ही घसरण थांबली असती तर. परंतु एकास दहाचे निकष असतानाही आपल्या मर्जीतील उमेदवार त्यामध्ये बसणार नाही म्हणून 12 ते 17 व 19 पर्यंत, आपल्या मनाला जसे पटेल तसे मुलाखतीचे कॉल सोडण्यात आले. इथपर्यंतही त्यांचा निर्लज्जपणा मी सहन करु शकलो असतो. त्यापुढेही त्यांनी पाऊले टाकली. त्यामध्ये दोनच असे उमेदवार होते की, त्यांचे एकाचे ग्रॅज्युएशन, पोस्ट ग्रॅज्युएशन आणि मुलाखतीचे मार्क होते. त्यामध्ये एक विद्यार्थी असा होता की, त्यास पोस्ट ग्रॅज्युएशनचे मार्क देण्यात आले, परंतु त्याच्याकडे डिग्री सर्टीफिकेट नसल्यामुळे त्याचे मार्क गृहीत न धरता, आपल्या मर्जीतील उमेदवाराला घुसविण्याच्यादृष्टीने प्रयत्न झाले. मला अजून समजले नाही की, एखाद्या शाखेचा विद्यार्थी पोस्ट ग्रॅज्युएट नसतानाही पोस्ट ग्रॅज्युएट होऊ शकतो, असा जावई शोध विद्यापीठातील प्रशासनाने लावलेला आहे. मला वाटते की, कुठल्या पध्दतीने उच्च शिक्षणाच्या बाबतीत शासन धिंडवडे काढत आहे व ते सहन करीत आहे ? तोंडात बोटं घालावे अशा प्रकारची स्थिती आहे. लेखी परीक्षेमध्ये 65 मार्क पडलेल्या

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

विद्यार्थ्यांस तोंडी परीक्षेमध्ये एक मार्क देण्यात आला व लेखी परीक्षेमध्ये 45-48 मार्क असतील त्याला मात्र 25 पैकी 24 मार्क देऊन, त्याला सिलेक्ट करण्याच्या दृष्टीने पाहण्यात आले. अशा प्रकारे सिलेक्शन करुन त्याठिकाणी 50 नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. याबाबतीत अन्याय झााल्यामुळे 25 विद्यार्थी कोर्टामध्ये गेले व 12 विद्यार्थी उपोषणाला बसले. याबाबततीत मी कुलगुरुंना सांगितले की, आपण नवीन आला आहात व अशा प्रकारे नोकर भरतीमध्ये जो भ्रष्टचार झाला आहे त्यास आपण प्रोटेक्शन का देत आहात ? याठिकाणी आपण चांगले काम करण्याच्या दृष्टीने लक्ष घालणार का ? असे विचारले असता, त्यांनी मला सांगितले की, मी याबाबतीत एका निवृत्त न्यायाधिशाची नेमणूक केलेली आहे. ते जे सांगतील ते मी करीन, असे त्यांनी मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, निवृत्त न्यायधिशांमार्फत चौकशी करण्याची गरज नसून आपण त्याठिकाणी बसा, कुलगुरु म्हणून आपल्याला सगळया पॉवरर्स् आहेत. आपण फक्त आपल्या सद्सद्विवेकबुध्दीला स्मरुन सांगावे की, हे विद्यापीठाच्या हिताचे झाले नाही, त्यामुळे मी या नेमणुका रद्द करीत आहे, अशा प्रकारची कणखर भूमिका आपण घ्यावी, आम्ही सर्वजण आपल्या पाठीशी आहोत. विद्यापीठात आणि राजकारणात फारसा फरक करण्याची गरज नाही, राजकारणासाठी शेकडो निवडणुका आम्हाला करावयाच्या आहेत. त्यावेळी कुलगुरु असे म्हणाले की, मी असे जर केले तर माझ्यावर टीका-टिप्पणी होईल. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, आपण असे घाबरुन कसे विद्यापीठ चालवणार ? आपण हे आव्हान कणखर स्वीकारले पाहिजे. त्यांनी सांगितले की, याबाबतीत निवृत्त न्यायाधीश श्री.माने यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल तीन महिन्यांत येईल, त्यानंतर आयोगाने ज्या शिफारसी केलेल्या आहेत त्याची जशीच्या तशी अंमलबजावणी केली जाईल. त्यावेळी मी असे मत मांडले की, मला हे पटत नाही, परंतु आपण निवृत्त न्यायाधिशांचे नाव घेतल्यामुळे न्याय देवतेला मान्य करुन मी गप्प बसतो. सभापती महोदय, त्यानंतर निवृत्त न्यायाधीश श्री.माने आयोगाचा अहवाल आला, त्या अहवालाने 12 नेमणुका रिझर्व्हेशन व सरळसेवेच्या घोटाळयातून रद्द कराव्यात अशा प्रकारचा अहवाल दिला. अशा प्रकारे कुलगुरुंनी नेमलेल्या निवृत्त न्यायाधिशांचा अहवाल आला असताना, तसेच जे

..3....



SSP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

न्यायालयात गेलेले आहेत, त्यांचा मात्र न्यायालय सांगेल त्याप्रमाणे आदेश करु, मी त्या भानगडीत पडणार नाही, असे त्यांनी सांगितले. अशा प्रकारे निवृत्त न्यायाधीश श्री.माने आयोगाचा स्वच्छ, स्पष्ट अहवाल आला असताना व तो अहवाल विद्यापीठाला सादर झाल्यानंतर विद्यापीठाने सहा महिने तो अहवाल दाबून ठेवला.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...............

गेल्या अधिवेशनात मला यासंदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करावी लागली होती आणि ही लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंदर्भात सभापती महोदयांना विनंती करावी लागली होती. सभापती महोदय, केवळ खेळखंडोबा चालला आहे. ज्यांच्यामध्ये गुणवत्ता नाही असे लोक वशीला लावून नियुक्त झाले आहेत. अशा भ्रष्टाचारी पध्दतीने नेमणुका होणार असतील तर हे विद्यापीठ कोलॅप्स होण्यापासून वाचविण्यासाठी हे शासन काही करणार आहे किंवा नाही ? श्री.माने यांनी आपला अहवाल विद्यापीठाला सादर केल्यानंतर मॅनेजमेंट कॉन्सिलची बैठक 6 महिने घेण्यात आली नाही, हा अहवाल बाजूला ठेवण्यात आला. 6 महिन्यांनंतर जेंव्हा मॅनेजमेंट कॉन्सिलची बैठक झाली तेंव्हा आमच्याकडून विचारणा करण्यात आली. त्यावेळी असे सांगण्यात आले की, कर्मचारी संघटनेचा दबाव असल्याकारणाने 12 कर्मचा-यांना काढता येणार नाही. 12 कर्मचा-यांना न काढण्यामागचे कारण विचारल्यानंतर त्यांनी जे उत्तर दिले ते अंगावर काटे आणणारे होते. हे 12 कर्मचारी कायम झालेले नसतांना कर्मचा-यांच्या सहकारी बँकेने 2 ते 3 लाख रुपये कर्ज त्यांना दिलेले आहे. या कर्मचा-यांना कामावरुन काढले तर बँकेचे कर्ज बुडेल. जर या कर्मचा-यांना कामावरुन काढले तर कुणीही कर्मचारी काम करणार नाहीत, अशा प्रकारचा इशारा कर्मचारी संघटनेने दिला होता. कर्ज घेऊन आणि पैसे देऊन या कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली होती. वा...रे विद्यापीठ, वा....रे कर्मचारी संघटना आणि वा....रे तुमची नेमणुकीची पध्दत. अशा पध्दतीने तेथील काम चालणार असेल आणि त्याला सरकारकडून संरक्षण देण्याची प्रवृत्ती असेल तर उच्च शिक्षणाची वाट लागण्यासाठी आणखी काय करावे लागणार आहे ? हे केवळ नोकर भरतीबाबतच झालेले आहे असे नाही तर डायरेक्ट कुलगुरुंबाबतही आरोप झालेले आहेत. आपल्या मुलीला आणि जावयाला नोकरीत घेण्यासाठी नेमणुकीसंदर्भातील सर्व निकष धाब्यावर बसविण्यात आले आहेत. आम्हाला मात्र नेहमी प्रश्न पडत होता की, चांगले प्राध्यापक विद्यापीठात का येत नाहीत ? नेमणुकीसाठी जे पॅनल तयार करण्यात आले होते त्या पॅनलमध्ये गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश येथील तज्ञ मंडळींचा समावेश होता. परंतु, त्यांना सांगण्यात आले की, आम्हाला या ठिकाणी ठरलेलीच माणसे घ्यावयाची आहेत. अशा रितीने यामध्ये सुध्दा प्रचंड मोठया प्रमाणावर गडबड, घोटाळा झालेला आहे. यासंदर्भात, कुलगुरु, कुलपती, शासन यांच्याकडे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.............

अर्ज-विनंत्या, तक्रारी करुन आता विद्यार्थी संघटना रडकुंडीला आलेल्या आहेत. परंतु, शासन यंत्रणा मात्र ढिम्म आहे, शासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही. कास्ट व्हेरिफिकेशन, क्वालिफिकेशन, टिचिंग-नॉनटिचिंग यासंदर्भातील कोणत्याही अटींचे पालन विद्यापीठाकडून झालेले नाही. कोणताही क्रायटेरिया पाळण्यात आलेला नाही. तुम्ही फक्त त्यांना विचारा, तुम्हाला सगळयाबाबतीत अनियमितता आढळून येईल. प्रोफेसरच्या पदासाठी आलेले चांगले अनुभवी, डॉक्टरेटची डिग्री असलेले डावलण्यात आले, अशी तेथील अवस्था आहे. ज्या प्राध्यापकांनी International journal present केलेले आहेत त्यांना डावलण्यात आले आहे आणि मर्जीतील लोकांना घेण्यात आले आहे. परभणी येथील कुलगुरुंना सक्तीने रजेवर पाठविण्यात आले. नांदेड येथील कृषि विद्यापीठावर सन्माननीय सभापती महोदयांच्या निदेशावरुन मला आणि सन्माननीय सदस्य, प्रा.जोगेंद्र कवाडे यांना सिनेट सदस्य म्हणून नेमण्यात आले. परभणी येथील झालेली अनियमितता विभागीय आयुक्त, श्री.कृष्णा भोगे यांनी वर्तमानपत्राव्दारा चव्हाटयावर आणलेली आहे. त्यांनी असे सांगितले आहे की, विद्यापीठाला वाचविण्याचे मला शक्य होते तेवढे प्रयत्न मी केले आहेत, परंतु आता ते माझ्याही हाताबाहेर गेलेले आहे, हे विद्यापीठ कोमात गेल्यासारखी परिस्थितीत निर्माण झालेली आहे आणि यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने काही केले तरच कृषि विद्यापीठ, परभणी कोमातून बाहेर येऊ शकेल. अशा प्रकारचे जाहीर वक्तव्य श्री.कृष्णा भोगे यांनी परभणी येथे केलेले आहे. रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेड येथे नवीन कुलगुरु आलेले आहेत. त्यांची नेमणूक झाल्यानंतर मी स्वत: त्यांची भेट घेतली. मी त्यांना सांगितले की, मागील लोकांनी जो गोंधळ घातला असेल तो जाऊ द्या. तुमचे यासंदर्भातील काय मत आहे ते आम्हाला सांगा. या ठिकाणी फायनान्शियल अनियमितता झालेल्या आहेत, भ्रष्टाचार करुन लोकांना नेमलेले आहे. असे सर्व असतांना आणि चौकशीचा अहवाल आलेला असतांना ॲक्शन का होत नाही ? विद्यापीठात केवळ याचीच चर्चा होणार आहे काय ? जे यामध्ये दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करुन हा विषय एकदाचा का संपवित नाही ? तुमची अडचण काय आहे ? आम्हाला चौकशी अहवाल का उपलब्ध करुन देत नाही ? त्यांनी सांगितले की, मी कुलगुरु म्हणून यासंदर्भात तुम्हाला काहीही सांगू शकत नाही. मी तुम्हाला चौकशी अहवाल देऊ शकणार नाही. हे उत्तर त्यांच्याकडून ऐकून मी मात्र थक्क झालो.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ......... 12:30

श्री.श्रीकांत जोशी .........

माहितीचा अधिकार या कायद्याद्वारे सर्वसामान्य माणसाला अधिकार मिळालेला आहे. या कायद्यामुळे सर्वसामान्य माणसाला माहिती उपलब्ध होऊ शकते. मी आणि सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी कुलगुरुंना असे सांगितले की, चौकशी अहवाल लोकांसमोर जाऊ द्या आणि तुमचे मत 2-3 महिन्यांमध्ये देऊन तुम्ही मोकळे व्हा. त्यांनी आम्हाला असे सांगितले की, मी चौकशी अहवाल लोकांसमोर जाऊ देणार नाही. कारण चौकशी अहवाल लोकांसमोर आला तर विद्यापीठाच्या हिताला बाधा येईल. विद्यापीठ चौकशी अहवाल तयार करण्यास सांगते. चौकशी अहवाल तयार होतो आणि कुलगुरू तो अहवाल दाबून ठेवतात आणि हा चौकशी अहवाल मी कोणालाही बघू देणार नाही, असे सांगतात. सभापती महोदय, हे शिक्षण क्षेत्र आहे ? ही पद्धत आहे ? सरकारने का नियम तयार केले नाहीत ? उच्च शिक्षण मंत्री सर्व कुलगुरुंची बैठक का घेत नाहीत ? तुमच्याकडे अनियमिततेची, भ्रष्टाचाराची, नोकर भरतीच्या गैरव्यवहाराच्या चौकशीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? पुढच्या तीन महिन्यांच्या आतमध्ये यावर ॲक्शन झाली पाहिजे. जे नालायक लोक आहेत, ज्यांनी बदमाशी केलेली आहे, ज्यांनी खोटी कागदपत्रे दिलेली आहेत, त्यांच्यावर कारवाई झ ााली पाहिजे. शिक्षण क्षेत्रामध्ये असा गोंधळ चालणार नाही अशी भूमिका वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टीसाहेबांनी का घेतली नाही ? माननीय वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील साहेबांनी बैठक घेऊन दोन-चार अधिका-यांवर कारवाई करुन त्यांना का घरी पाठवून दिले नाही. उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये अशा प्रकारचा गोंधळ होणार असेल तर तो मी खपवून घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी का घेतली नाही ? सभापती महोदय, मला एका दिवशी एका मार्ट संघटनेच्या अध्यक्षांचा फोन आला. मी वैद्यकीय शिक्षणासंबंधी बोलत आहे. त्यांनी मला असे सांगितले की, मला जाणीवपूर्वक नापास करण्यात आले आहे. तुम्ही आमच्या दोन्ही प्राध्यापकांशी यासंबंधी बोला. मी त्यांना सांगितले की, मी असल्या गोष्टींबद्दल बोलत नसतो याची तुम्हाला कल्पना आहे. तुम्ही पदवीधरांचे नेते आहात. आमच्यावर अन्याय होत आहे. मी त्याला विचारले की, आर यु शुअर, तुझ यावर अन्याय होत आहे ? मी शंभर टक्के खरे सांगतो की, माझ्यावर अन्याय होत आहे, असे त्याने मला सांगितले. मी त्याला सांगितले की, तू लक्षात ठेव, तुझ्यावर अन्याय होत असेल तर मी तुझ्या बाजूने आहे आणि तू खोटे बोलत असेल तर मी तुला रस्टीकेट नाही तर टर्मिनेट

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .........

करण्याच्या मागे लागेन. मी अशा कोणत्याही गोष्टींमध्ये लक्ष देत नसतो हे तू लक्षात ठेव, असे मी त्याला सांगितले. मी असे बोलल्यानंतर त्याचा मला फोन येणे बंद झाले. काही दिवसानंतर मला असे कळले की, तो पास झाला. मग मी त्या प्राध्यापकाला फोन केला. तो खूप बदमाश आहे, त्याला पास करणे शक्य नाही, त्याला काही येत नाही, तो गुंडागिरी करतो, त्याचा फक्त पास होण्याकडेच कल असतो, त्याला मेरीट नाही असे तुम्ही मला सांगितले होते. मग तो कसा पास झाला ? सभापती महोदय, महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचा दर्जा किती खाली गेला आहे हे यावरुन दिसते. त्यांनी मला असे सांगितले की, तुम्हाला विद्यापीठामध्ये काम करावयाचे असेल तर त्याला पास करा असे माझ्यावर विद्यापीठातून प्रेशर आले होते. अजूनही पोस्ट ग्रॅज्युऐशन हे विद्यापीठाशी संलग्न आहे. मला हे समजलेले नाही की मेडीकल एज्युकेशन आरोग्य विद्यापीठाशी संलग्न आहे आणि पोस्ट ग्रॅज्युऐशनचे मार्क मात्र तेथील कन्सर्न विद्यापीठाशी संलग्न आहेत. त्यांना असे सांगण्यात आले होते की, तुम्हाला या मुलांना पास करावेच लागेल, नाही तर आम्ही कोणताच निकाल जाहीर करणार नाही. म्हणून विद्यार्थी संघटनेच्या त्या दोन्ही पदाधिका-यांना पास करण्यात आले. प्राध्यापकांनी घाबरुन त्यांना पास केले. हे करविणारे कोण होते ? विद्यापीठाच्या परीक्षा विभागामध्ये आणि मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये काम करणारे एक वजनदार व्यक्तिमत्व होते. आता दुर्दैवाने त्यातील कोणीही राहिलेले नाही. सर्व परिस्थिती बघितल्यानंतर असे वाटते की, सरकार म्हणून यांचे लक्ष आहे काय ? सभापती महोदय, मी जालन्याच्या जी.एस. कॉलेजमध्ये गेले होतो. तेथील 25 विद्यार्थी सी.ई.टी. मधून मेडीकल, इंजिनिअरिंगमध्ये लागलेले आहेत. मी त्यांना विचारले की, तुमची खंत काय आहे ? त्यांनी मला असे सांगितल की, 18 एकरमध्ये या कॉलेजची सुंदर बिल्डींग आहे. ही 50 वर्षापूर्वीची जुनी संस्था आहे. परंतु येथील सर्व विद्यार्थी बदनापूर आणि जाफराबादला जात आहेत. आमच्या जालण्यामध्ये शिकावयास कोणी तयार नाही, ही आमची खंत आहे. मी त्यांना विचारले की, तुम्हाला काय अडचण आहे ? बदनापूरचे कॉलेज खूप चांगले आहे काय ? त्यांनी मला असे सांगितले की, बदनापूरचे कॉलेज चांगले नाही. त्या कॉलेजमध्ये खोल्याही खूप कमी आहेत. त्या कॉलेजमध्ये जावेच लागत नाही. कॉलेजमध्ये न जाता देखील विद्यार्थी पास होतात. तेथे पेपर देण्यापासून सर्व सोई उपलब्ध आहेत. तेथे फक्त ॲडमिशन घ्यावी

...3/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .........

लागते. परीक्षेला नवीन माणूस बसविण्यापासून सर्व कॉन्ट्रॅक्ट त्यांनी घेतलेला आहे. मी त्यांना विचारले की, अशी कॉलेजेस मराठवाडयामध्ये किती आहेत ? सभापती महोदय, 400 महाविद्यालयांपैकी 100 महाविद्यालयांचा कारभार यावर चालतो. भरपूर विद्यार्थी आणावयाचे आणि पटसंख्येच्या आधारे प्राध्यापकांची संख्या मंजूर करुन घ्यावयाची, अपॉईंटमेंटसाठी लाखो रुपये घ्यावयाचे आणि मुलांना पास करावयाचे कॉन्ट्रॅक्ट करावयाचे ? मुले कोठे जातात याचा कोणालाही पत्ता नसतो.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

विद्यापीठाचे विद्यार्थी म्हटले की, मग ते जालन्याच्या कॉलेजचे विद्यार्थी असा समज होतो. मी आमच्या भागातील 'पोरे' हाच शब्द वापरतो त्यामुळे मग बदनापूर वगैरे भागातील कॉलेजातील ते विद्यार्थी असे समजले जाते. यामध्ये कोठल्याही एका विशिष्ट कॉलेज आहे असे नाही, अर्थात त्यात मला कोठलाही राजकीय रंग आणावयाचा नाही. सभापती महोदय, यातील 2-3 मुद्दे मला येथे मांडावयाचे आहेत. त्यापैकी एक म्हणजे अल्पसंख्यांक संस्थांची कॉलेजेस् आणि बी.एड.चा मॅनेजमेंट कोटा. बी.एड. ही शिक्षक निर्माण करणारी संस्था आहे. त्यातून आपण दोन तीन लाख लोकांना रोजगार देऊ शकतो. पण त्यासाठी वेगळी सीइटी आहे. मग त्यासाठी वेगळी परीक्षा घ्यावी की नाही ? त्यासाठी शासनाचे निकष काय आहेत ? आता याची परीक्षा होते की नाही हे माहीत नाही. पण मग आमच्या उच्च शिक्षण विभागाने या बाबतीत काय केले आहे वा करीत आहे ? या क्षेत्रामध्ये करोडा रूपयांचा टर्न ओव्हर चालू आहे. ते तरी तुम्ही उघड करा. तसेच अल्पसंख्यांक कमिशनच्या संस्था. मला वाएटले की, त्या संस्थांमध्ये मुस्लिम, बौद्ध, जैन समाजाचे विद्यार्थी जास्त संख्येने असतील. पण पाहिले तर त्या ठिकाणी त्या समाजाचे विद्यार्थीच नाहीत. जो जास्त पैसे देईल त्याला त्या संस्थेत प्रवेश असा सरळ हिशोब तेथे आहे. मी त्यापैकी एका संस्थेच्या चालकांना विचारले की, अल्पसंख्यांकाची संस्था म्हणून तुमच्या संस्थेला मान्यता आहे तेव्हा तुमच्या समाजाचे विद्यार्थी तुम्ही का घेत नाही ? तेव्हा त्यांनी मला सांगितले की, ती मुले मग पैसे देत नाहीत. आम्हाला केवळ 'अल्पसंख्यांक' दर्जा पाहिजे, कशासाठी ? तर जास्त पैसे घेण्यासाठी. या बाबतीत आता आपला उच्च शिक्षण विभाग काय करणार आहे ? सभापती महोदय, या निमित्ताने मला आपल्याकडील इंजिनिअरींग कॉलेजसंबंधात देखील सांगावयाचे आहे. पूर्वी महाराष्ट्रातील इंजिनिअरींग कॉलेजेस म्हटली म्हणजे 10 पैकी 8 तरी टॉप 10 मध्ये असायची. मग त्यात आयआयटी असेल, पुणे इंजिनिअरींग असेल वा भारतीय विद्यापीठाचे असेल. परवाच माझ्याकडे यादी आली, त्यात 175 पेक्षा जास्त कॉलेजेस होती. पण त्यात टप्प्याटप्प्यामध्ये उत्तर भारत आणि दक्षिण भारतातील इंजिनिअरींग कॉलेजेस, संस्था अखिल भारतीय पातळीवर आज टॉप वर जात आहेत. मी एक इंजिनिअर असल्याने आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्याकडील इंजिनिअरींग कॉलेजांचा आम्हाला अभिमान वाटेल अशी या क्षेत्रात आपली परंपरा होती. आम्हाला त्याचा गर्व वाटायचा. आपल्याकडे सगळ्यात टॉपची इंजिनिअर कॉलेजेस आहेत, सर्वात बेस्ट इंजिनिअरींग

...... एच 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ....

कॉलेजेस ती समजली जातात. पण आता ही टॉपची जागा खाली येऊ लागली आहे. आता तामिळनाडू, दिल्ली, केरळा, पंजाब इंजिनिअरींग कॉलेजेस अखिल भारतीय पातळीवर उच्च स्थानावर आहेत. इतकेच नाही तर वेल्लूरचे नवे कॉलेज देखील आता वर जायला लागले आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा म्हणजे आमचा उच्च शिक्षण विभाग कोठे आहे ? आज उच शिक्षणाचा ज्या गतीने प्रसार होत आहे, त्यामध्ये महाराष्ट्रातील व्हॅक्यूम बदलण्यासाठी एकमेव कार्यक्रम करून हा विभाग हात झटकून घेणार आहे काय ? महाराष्ट्रातील हा व्हॅक्यूम भरण्याच्या दृष्टीकोनातून काही तडफदार पावले आपण उचलणार आहात का ? तुम्ही अधिक चांगले काम केल्यावर आताची जी बिघडलेली परिस्थिती आहे ती निश्चितपणे सुधारू शकेल. याबाबतीत आयुर्वेदाचे तत्त्व उच्च शिक्षणामध्ये देखील वापरले गेले पाहिजे. आज उच्च शिक्षणामध्ये शंभरावर सायन्सचा करिक्यूलम आहे, त्यात ॲनिमेशन, एव्हिएशन वगैरे अनेक विषय येतात. पण त्याकडे महाराष्ट्र सरकारचे लक्ष किती आहे ? आपल्याकडील रेग्युलर करिक्यूलम आपण बदलणार आहात का ? मी प्रत्येक वेळेस या संदर्भात नियम 93 खाली सूचना देऊन थकलो आहे. एक म्युझिक आणि दुसरे स्पोर्टस् विषयांच्या शाखांमध्ये एक तरी विद्यापीठ असावे म्हणून अनेकदा विनंती येथे केली आहे. पण आमच्या मंत्र्यांना 1 लाख लोकांना रोजगार देणाऱ्या या क्षेत्रात विद्यापीठ वा विद्याशाखा निर्माणकरण्याच्या दृष्टीने बैठक घेण्यास देखील वेळ मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे एवढेच मला येथे सांगावयाचे आहे. एवढे बोलून मी भाषण संपवितो.

****

( यानंतर श्री. सरफरे ....आय 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, परवाच्या दिवशी एका अतिशय महत्वाच्या विषयावरील अडीच ते तीन तास चाललेली व अपूर्ण राहिलेली चर्चा आज पुन्हा पुढे चालू ठेवली आहे त्याबद्दल मी आपला आभारी आहे. या ठिकाणी सकाळी हायकोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख झाला, आणि त्यासंबंधी निर्देश दिले व एक निवेदनही करण्यात आले. मी एक व्यक्ती म्हणून आपल्याला कोणत्याही प्रकारे दोष देत नाही.परतु राजकीय कंपल्शन म्हणून आपण या शिक्षण संस्था चालवितो की गुणवत्ता म्हणून चालवितो? आपण एका पत्रकार परिषदेमध्ये यांसंबंधीच्या पहाणीचा निष्कर्ष जाहीर केला आहे. महाराष्ट्रामध्ये 1 ली ते 7 वी पर्यंत एकूण 74 लाख 2 हजार 478 विद्यार्थ्यांच्या चाचण्या घेण्यात आल्या. त्यामध्ये 31 लाख 70 हजार विद्यार्थ्यांना अंक आणि शब्दांची ओळख अद्यापपर्यंत झाली नसल्याचे आढळून आले. त्याच तपशिलामध्ये पुढे असे म्हटले आहे की, इयत्ता पहिलीमधील सहा लाख विद्यार्थ्यांना आजचा वार कोणता हे चाचणीमध्ये सांगता आले नाही. तसेच, इयत्ता दुसरीतील 4 लाख 54 हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना 1 ते 10 अंक इंग्रजीमधून सांगता आले नाहीत. अशी दारुण स्थिती या शिक्षण क्षेत्रामध्ये उद्‌भवली आहे. या शिक्षण व्यवस्थेवर आपण खर्च किती करीत आहोत? बजेटमधील तरतुदीनुसार प्राथमिक शिक्षणासाठी आपण 9 हजार 500 कोटी रुपये खर्च करतो. केवळ शासकीय पातळीवर गोरगरीबांना शिक्षण मिळावे हा यामागे आपला उद्देश आहे. 31 लाख 70 हजार विद्यार्थ्यांची चाचणी घेतली, त्यानंतरचा चाचणीचा अहवाल आपण जाहीर केला नाही. डॉ. मा. गो. माळी हे महात्मा फुले संशोधन संस्थेमध्ये लेखक आहेत. त्यांनी सांगितले की, आपण पहाणी केल्यानंतर, त्याचे वर्गीकरण केले नाही. 31 लाख 70 हजार विद्यार्थ्यांची गुणवत्ता खालच्या दर्जाची आहे. त्यांना आजचा वार सांगता आला नाही, आणि 1 ते 10 इंग्रजीचे अंक सांगता आले नाहीत. त्यांना मराठीचे काही शब्दही सांगता आले नाहीत. महाराष्ट्रासारख्या शिक्षण क्षेत्रामधील प्रगत राज्याची ही स्थिती आहे. त्यामध्ये असलेली भयावह स्थिती त्यांनी सांगितली आहे. ही स्थिती श्रीमंतांच्या मुलांची नाही. संशोधन केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले आहे की, ही मुले प्रामुख्याने

मागासवर्गीय, आदिवासी, भटक्या जमाती, बालमजूर, ज्यांचा आपण अल्पसंख्यांक म्हणून मतांसाठी अनुनय करतो त्यांचा सुध्दा यामध्ये समावेश आहे. त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष न देता, आपण केवळ त्यांची मते मागता. या 31 लाख 70 हजार विद्यार्थ्यांमध्ये 90 टक्के विद्यार्थी हे मागासवर्गीय, आर्थिक दृष्टया गरीब वर्गातील आहेत ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्याकडे लक्ष देऊन आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

त्याबाबत उपाय योजना करणे आवश्यक आहे. ही स्थिती महाराष्ट्रामध्ये कां आली? त्या विद्यार्थ्यांचे आई-वडिल, पालक हे अज्ञानी व परिस्थितीने गांजलेले असतात. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त होण्यासाठी, त्यांच्यासाठी अनेक उपाय योजना करणे आवश्यक आहे. परंतु ते होत नाही. आपणास माहीत आहे की, माननीय श्री. शरद पवार साहेबांची कन्या श्रीमती सुप्रिया सुळे यांनी मुंबई शहरामध्ये भांडूप येथे एक अत्याधुनिक शाळा चालविली आहे. अतिशय आधुनिक काळाला अनुरुप अशातऱ्हेने वातानुकुलित वर्गाची ती शाळा असून, त्या विद्यालयामध्ये झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे परवडणार नाही. कारण त्या ठिकाणी शिक्षणासाठी दोन ते तीन हजार रुपये खर्च येत असेल तर अशा ठिकाणी गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे त्यांच्या पालकांना परवडणार नाही. आणि म्हणून दर्जेदार शिक्षण ही केवळ श्रीमंतांची मक्तेदारी झाली आहे, गुणवत्तापूर्वक शिक्षण ही श्रीमंतांची मक्तेदारी झाली आहे. आणि ती तोडून टाकण्यासाठी प्राथमिक शिक्षण संशोधन समिती नेमून त्यामध्ये आपल्या पसंतीच्या लोकांना नेमू नका. म्हणजेच ज्यांना निवडणुकीमध्ये तिकिट मिळत नाही अशा लोकांची त्या समितीवर वर्णी लावू नका. समाजातील गोरगरीबांच्या शिक्षणाबद्दल ज्यांना आच आहे व ज्यांना त्याची जाणीव आहे अशा लोकांची समिती नेमावी. शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करावयाचा असेल तर तो कशाप्रकारे करणे आवश्यक आहे, तो करण्यासंबंधी त्या समितीला पूर्ण अधिकार द्या. आपल्याकडील शिक्षण पध्दती ही केवळ "परीक्षार्थी शिक्षण पध्दती" आहे. केवळ तीन आणि सहा महिन्यांनी परीक्षा घेतली जाते. आपल्याकडे अनेक अर्थहीन मुद्दे चर्चिले जातात. अभ्यासक्रमामध्ये महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु यांचे धडे ठेवले की नाहीत? अकबर आक्रमक होता की दयाळू होता? अकबराने दिनेइलाही धर्म काढला याबाबत समाजाला काय करावयाचे आहे? लॉर्ड कर्झन, लॉर्ड क्लिटन लॉर्ड बेंटींग, लॉर्ड डलहौसी, इत्यादी बाबींचे 100 मार्कांचे इतिहासाचे प्रश्न असतात. बी.ए. ला जर कुणी हिस्ट्री हा विषय घेतला तर त्या अभ्यासक्रमामध्ये एकूण 600 मार्कांपैकी 200 मार्कांचा ब्रिटीशांचा इतिहास असतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 12:45

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु...

मला असे वाटते की,ब्रिटिशांनी कारकून निर्माण करणारे कारखाने निर्माण केलेले आहेत. आपल्याकडे पदवी घेतलेले विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडतात, त्या पदवीच्या भेंडोळ्याचा उपयोग दीड वीत पोट भरण्यासाठी करता येत नसेल तर त्यांच्या पदरी निराशा येते, ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. अशा प्रकारची अपप्रवृत्ती निर्माण होत आहे. म्हणून मला असे वाटते की, त्यांच्यामध्ये आत्मबल निर्माण करावयाचे असेल तर आपल्याला बाजारपेठेतील ज्ञान मिळणे आवश्यक आहे. टी.व्ही., कॉम्प्युटर, मोबाईल इत्यादि शिक्षण मिळणे आवश्यक आहे, म्हणजे महाविद्यालयामधून 10 वी, 12, वी पास झाल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी घेतलेले शिक्षण पोट भरण्यासाठी त्यांना करता येईल. अशाप्रकारची उपाययोजना होणे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, अनेकवेळेला शिक्षकांना दोष दिला जातो. परंतु त्यांना वर्षभरामध्ये 38 प्रकारची कामे दिलेली आहेत, याची एकदा मंत्री महोदयांनी पहाणी करणे आवश्यक आहे. यापूर्वी शिक्षण अभियानाच्याबाबत चर्चा झाली, त्या संदर्भाने अनेक सूचना करण्यात आलेल्या आहेत. शिक्षण अभियानाचे पैसे केंद्राकडे परत केलेले आहेत. बऱ्याच छोट्या छोट्या गोष्टींमध्ये दुर्लक्ष केलेले आहे. सर्व शिक्षण अभियानाच्या माध्यमातून आलेल्या पैशातून कोणत्याही शाळांना साहित्य दिलेले नाही. अनेक शाळांच्या ठिकाणी शाळा ग्रंथालये पाहिली तर त्या ठिकाणी 100, 150 पुस्तके देखील नसतात. ग्रंथालयामध्ये असणाऱ्या पुस्तकातून विद्यार्थ्याला ज्ञान मिळणे, हा शालेय जीवनाचा पाया आहे. इयत्ता आठवी, नववी, दहावी,च्या विद्यार्थ्यांना एकूण शैक्षणिक वर्षाच्या कालखंडामध्ये समाज सुधारकांची माहिती असणे आवश्यक आहे, इतिहाची माहिती असणे आवश्यक आहे, सामाजिक जाणिवांची, बदलत्या परिस्थितीची माहिती पाहिजे. आज जग कोठे आहे, याची त्यांना माहिती असणे आवश्यक आहे. जी अभ्यासक्रमामध्ये पुस्तके असतात, त्याच्या व्यतिरिक्त ग्रंथालयामध्ये इयत्ता आठवी, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला येणाऱ्या प्रश्ना व्यतिरिक्त वाचन करतात की नाही ? हे कोण पहाते की नाही हे पाहिले जात नाही. शाळेमध्ये उपलब्ध असलेले इयत्ता दहावी, 12 वीचे शिक्षक असतील त्याच्यापैकी एकाला सांगण्यात येते की, तुम्ही लायब्ररीचा विभाग पहा. परंतु त्या ठिकाणी विद्यार्थी येऊन वाचन करतो की नाही , हे कोणी पहात नाही. दरवर्षी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त काही पुस्तके आपण विद्यार्थ्यांना वाचनाकरिता दिली पाहिजेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर योचे चरित्र, अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र, त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणा इ. गोष्टी इयत्ता आठवी, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांनी वाचली पाहिजेत, राजा राममोहन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु....

रॉय समाज सुधारक होऊन गेले, त्यांचे त्यांनी चरित्र वाचले पाहिजे, परंतु आजच्या विद्यार्थ्यांना याचे जुजबी ज्ञानही नसते. मला असे वाटते की, एक जबाबदार नागरिक तयार होणे आवश्यक आहे. संतांची माहिती किती विद्यार्थ्यांना आहे ? आर्टस्च्या विद्यार्थांना संत तुकाराम, ज्ञानेश्वरांची देखील माहिती नाही. पूर्वी भवभूतीची नाटके केली जात होती. महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षीच्या, दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना मालविका, शांकुतल यांचे श्लोक देखील सांगता येत नाहीत. आर्टस,सायन्स, कॉमर्सच्याही विद्यार्थ्यांना याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यांच्या जीवनामध्ये समाजातील अशा लोकांचे त्यांना ज्ञान असले पाहिजे, बऱ्या-वाईट लोकांची माहिती पाहिजे. ग्रंथालयाच्या माध्यमातून प्रगल्भ असे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल असे पाहिले पाहिजे. त्यानंतर शिक्षकांची भरती करताना त्यांची गुणवत्ता पहाणे आवश्यक आहे. आज रिझर्व्हेशनमध्ये देखील शिक्षकांची भरती करताना मग ते 10 शिक्षक जरी भरावयाचे असतील, बिंदू प्रमाणे भरती करावयाची असेल, किंवा एन.टी., ओ.बी.सी., एस.सी.चे उमेदवार शिक्षक या पदावर भरावयाचे असतील तर त्यांची गुणवत्ता आहे की नाही, त्यांच्यामध्ये शिक्षण देण्याची कार्यक्षमता आहे की नाही, हे पाहिले नाही तर त्याचे भयानक परिणाम होतील. पर्यावरण, सामाजिक शिक्षणासारखे नव्याने विषय सुरु केलेले आहेत. नवीन विषय सुरु करत असताना त्या विषयामध्ये प्रभुत्व असलेल्या शिक्षकांची भरती केलेली नाही.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

प्राथमिक शाळेमध्ये गणित शिकविणारा शिक्षक असेल, मराठी शिकविणारा शिक्षक असेल त्याला पर्यावरणाचा तास घेण्यास सांगतात. त्याना सामाजिक सुधारणेचा तास घेण्यास सांगतात. शाळेत पी.टी. शिकविणारा शिक्षक नसेल तर गणिताच्या शिक्षकाला मैदानात जाऊन कवायत घेण्यास सांगितले जाते. जे नवीन विषय सुरु केलेले आहेत त्या विषयाची योग्य पदे निर्माण करावीत आणि ती पदे त्या त्या शाळेत भरण्यात यावीत.

सभापती महोदय, शिक्षण सेवक योजना बंद करण्यात यावी. अडीच ते तीन हजार रुपयांमध्ये शिक्षकाचे काम करावयास लावणारी ही वेठबिगार पध्दतीची योजना शासनाने सुरु केलेली आहे. 5 ते 10 हजार रुपये वेतन घेणारा शिक्षक जे शिकवितो तेच शिक्षण आठ दहा तास घेऊन अडीच ते तीन हजार रुपये घेणारा शिक्षण सेवक शिकवितो. 3 हजार रुपयांमध्ये त्याच्या कुटुंबाची उपजीविका कशी भागत असेल ? याचा विचार केला पाहिजे. शाळांची नियमितपणे तपासणी होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये शाळांच्या इमारतींची अवस्था फार भयानक असते. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस नसतात. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक सुविधा नसतात. त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नसते. ज्यावेळी तपासणी अधिकारी त्या ठिकाणी जातात त्या दिवशी कोणी तरी येणार असल्यावर जसे स्वागताची तयारी करतो त्याप्रमाणे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक त्यांचे स्वागत करतात. तपासणी अधिकारी कशी तरी शाळेची तपासणी करतात. शाळांचे रँडम चेकिंग होणे आवश्यक आहे. जेव्हा राजा येतो त्यावेळी त्यांचे पायघड्या घालून स्वागत करण्यासाठी प्रजा उभी असते त्या पध्दतीने शाळा तपासणीसाठी अधिकारी येतात त्यावेळी शिक्षक उभे असतात. शाळांचे रँडम चेकिंग होणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी दर्जेदार शिक्षण, चांगले शिक्षण द्यावयाचे असेल तर त्या ठिकाणी आवश्यक त्या मूलभूत गरजा पुरवणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, क्लॉक अवर बेसिसवर काम करणाऱ्या शिक्षकांना 75 रुपये दिले जातात. काही सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, 20 रुपये दिले जातात. त्यांना 75 रुपये देणे म्हणजे आपण शिक्षकांचा अपमान करीत आहोत. या गोष्टी बदलणे अत्यंत आवश्यक आहे. त्या ठिकाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. मधुकर चव्हाण .....

घड्याळी तास सुरु होणे आवश्यक आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एखादा शिक्षक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याला स्वत:ची प्रॉव्हीडंट फंडाची रक्कम मागावयाची असेल तर शिक्षण संचालकांच्या वेगवेगळया कार्यालयांकडून पाच हजार रुपये, तीन हजार रुपये, 2 हजार रुपये मागितले जातात. परवा माझ्या शाळेला सन 2000 पासूनची राहिलेली नॉन सॅलरी ग्रँट 4 ते 5 लाख रुपये मंजूर केली. त्यासाठी आमच्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडून 5 हजार रुपये मागितले गेले. तुमच्या शिक्षण खात्यामध्ये हा काय भ्रष्टाचार चालू आहे ? मुख्याध्यापकांना विचारले तर ते म्हणतात की, आपल्याला 5 लाख रुपये मिळवावयाचे असतील तर हे असे करावे लागते. 5 हजार रुपये तेथील हेडक्लार्कला आणि इतरांना द्यावेल लागतील. ही भ्रष्टाचाराची दुर्गन्धी दोन तीन क्षेत्रामध्ये जाऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाच्या बाबतीत विद्यापीठामध्ये पेपर तपासण्यासाठी, पेपर सेट करण्यासाठी परीक्षक मंडळ किंवा बोर्ड ऑफ स्टडीज असते. त्यासाठी कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा लागतो तसेच त्यांचे खाजगी कोचिंग क्लासेसशी संबंध असता कामा नये. तसे ॲडिफिडेव्हीट त्यांच्याकडून लिहून घेणे आवश्यक असते. दर तीन वर्षानी बोर्ड ऑफ स्टडीज बदलले पाहिजे. मुंबई युनिव्हर्सिटीमधील संबंधित लोक निवृत्त झाले तरी बोर्ड ऑफ स्टडीज बदलले नाही. हेच शिक्षक खाजगी क्लासमध्ये असतात आणि मग गुण वाढविण्याचे भयानक प्रकार होतात. सभापती महोदय, पुणे, कोल्हापूर, मुंबई विद्यापीठामध्ये आठ दहा वर्षे झाली तरी विषय मान्यतेची प्रकरणे मंजूर होत नाहीत. त्यांचा पगार चालू असतो परंतु विषय मान्यतेचे प्रकरण तीन तीन वर्षे, दहा दहा वर्षे चालू असते. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण हे केवळ परीक्षार्थी शिक्षण न राहता ते पोटार्थी शिक्षण होणे आवश्यक आहे. ते केवळ पदव्या देणारे शिक्षण राहता कामा नये. प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढेल, सर्वांगाने जीवन जगण्यासाठी, आदर्श नागरिक तयार होण्यासाठी त्यांच्यामध्ये गुणवत्ता कशी निर्माण होईल यादृष्टीने अमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---- यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:55

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, याठिकाणी शिक्षणाच्या संदर्भात सुरु असलेल्या चर्चेमध्ये मी माझे मनोगत व्यक्त करणार आहे. गेल्या एक वर्षापासून मी विधान परिषदेमध्ये शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणून काम करीत आहे. या सभागृहामध्ये काम करीत असताना गेले वर्ष भर शिक्षण विषयक वेगवेगळे प्रकरचे प्रश्न या सभागृहामध्ये मी उपस्थित केलेले आहेत. आजच्या शिक्षण विषयक चर्चेच्या निमित्ताने जे प्रश्न आम्ही या ठिकाणी मांडत आहोत त्या प्रश्नांना हे शासन खरोखर न्याय देणार आहे काय ? आम्ही मांडलेल्या प्रश्नाकडे शासन गांभीर्याने लक्ष देऊन आम्हाला न्याय देणार आहे काय ? आम्हाला खरोखरच काही रिलिफ मिळणार आहे काय ? मागील एक वर्षाचा अनुभव असा आहे की, आतापर्यन्त जे जे विषय मी या सभागृहामध्ये मांडलेले आहेत त्याबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारची कृती करण्यात आलेली नाही. याठिकाणी फक्त चर्चा होतात आणि आश्वासने दिली जातात. शिक्षण क्षेत्रासंबंधची जेवढे विषय मी याठिकाणी मांडलेले आहेत त्याबाबतीत शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन न्याय दिलेला आहे असे अजूनपर्यन्त तरी झालेले नाही. मी सभागृहाचा अधिक वेळ न घेता काही महत्वाचे मुद्दे याठिकाणी मांडणार आहे. या मुद्यांना माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. सभागृह संपल्यावर विषय संपतो, असा प्रकार या चर्चेच्या बाबतीत होता कामा नये. माननीय मंत्री महोदयांनी हा विषय गांभीर्याने घ्यावा अशी माझी मनोमन इच्छा आहे. या शिक्षणाच्या विषयावर आतापर्यन्त अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त केलेली आहेत. मी देखील काही महत्वाचे मुद्दे या ठिकाणी मांडू इच्छितो. मध्यंतरी शासनाने राज्यातील सर्व शाळा एकाच दिवशी सुरु करण्याचा निर्णय घेतला. मला वाटते सर्व शाळा एकाच दिवशी सुरु करण्याचे बंधन शाळांवर टाकणे योग्य नाही. याबाबतीत नियम स्पष्ट आहेत. शाळांना जास्तीत जास्त 80 दिवस सुट्टी असते. आता त्यातील 4 सुट्टया कमी केल्यामुळे 76 दिवसांची सुट्टी असते. शाळांना 76 दिवसांची सुट्टी घेण्याची मुभा असली तरी शाळांनी सुट्टीचे नियोजन कसे करायचे, कोणत्या महिन्यामध्ये सुट्टी घ्यावी , किती तारखेला शाळा सुरु करावी, पहिले सत्र केव्हा सुरु करावे, यासंदर्भातील अधिकार हे शाळाप्रमुखांना होते. आता सर्व शाळा एकाच दिवशी सुरु करण्याच्या निर्णयामुळे विदर्भामध्ये गंभीर परिस्थिती निमार्ण झाली. तेव्हा या परिस्थितीचा विचार करता शासनाने एकाच दिवशी शाळा सुरु करण्याचा आग्रह धरु नये. मात्र 76 दिवसा पेक्षा जास्त दिवस सुट्टी घेऊ नये असा आग्रह धरावा. सुट्टी घेण्याबाबतच्या नियमाचे पालन होत असेल तर एकाच दिवशी शाळा सुरु करण्याबाबतचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...)

आग्रह शासनाने धरु नये.

सभापती महोदय, गुणवत्ता विकास कार्यक्रम याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. अप्रगत विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी, अप्रगत विद्यार्थ्यांनी सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने यावे, यासंदर्भात आमचे कोणतेही दुमत नाही. याबाबतीत जे जे काही प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे ते सर्व प्रयत्न करण्याची शिक्षकांची तयारी आहे. परंतु याबाबतीत कोणी सर्वेक्षण केलेले आहे ? किती प्राथमिक वा खाजगी शाळांची तपासणी केलेली ? खाजगी शाळांमध्ये केलेल्या तपासणीमध्ये विद्यार्थी अप्रगत असल्याचे दिसून आलेले आहे काय ? हे आम्हाला अजून समजलेले नाही. शाळांच्या बाबतीत सर्वशिक्षा अभियानांतर्गत जी आकडेवारी प्रसिध्द करण्यात आलेली आहे, ती आश्चर्यकारक स्वरुपाची आहे. 3 वर्षापूवी शासनाने शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या 15 लाख 78 हजार इतकी जाहीर केली होती. ती संख्या आता 2 लाख 39 हजारावर आली. 2003-04मध्ये शाळाबाह्य मुलांची संख्या 5 लाख 24 हजार होती. राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेचे म्हणणे असे आहे की, 2006मध्ये ही संख्या 15,78,863 इतकी झालेली आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनोद तावडे)**

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ MHM/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 13:00

श्री.रामनाथ मोते..........

त्यामुळे हे आकडे व शासनाने दिलेले, शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात दिलेले आकडे हे एकमेकाला छेद देणारे आहेत. परस्परविरोधी अशा प्रकारची विधाने किंवा परस्परविरोधी अशा प्रकारचे आकडे दिलेले आहेत. त्यामुळे आज जे काही सर्व्हेक्षण केले आहे त्यावर आमचा विश्वास नाही. सभापती महोदय, प्राथमिक शाळांमध्ये ज्या नगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आहेत, या शाळांमध्ये अप्रगत विद्यार्थ्यांच्या संदर्भात काही प्रयत्न करणे आवश्यक आहे. दर्जा जो खालावलेला आहे तो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत आहे. ज्या अनुदानित शाळा आहेत, विना अनुदानित शाळा आहेत, ज्या खाजगी संस्थांनी चालविलेल्या शाळा आहेत त्यांची आपण तपासणी करावी. या शाळांमध्ये अशा प्रकारच्या अप्रगत विद्यार्थ्यांची संख्या फार कमी दिसेल, शक्यतो दिसणार देखील नाही. परंतु या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये निर्माण झालेली परिस्थिती गंभीर आहे. शासनाच्या म्हणण्यानुसार अप्रगत विद्यार्थ्यांची गंभीर परिस्थिती आहे, याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गेल्या 5 वर्षामध्ये वर्गखोल्यांचा अनुशेष 72 हजार होता. शासनाने वेळोवेळी आश्वासने देऊनही 10 हजार वर्गखोल्यांचा अनुशेष पूर्ण केला. आजही महाराष्ट्रामध्ये 62 हजार वर्गखोल्या उपलब्ध नाहीत. अशा प्रकारच्या अप्रगत विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याचे सर्वात महत्वाचे कारण शोधून काढले पाहिजे. केवळ शिक्षकांना चांगला पगार मिळावा ही आमची भूमिका नाही. शिक्षण सेवक योजना 6 वर्षापासून शासनाने सुरु केली ते सगळयात महत्वाचे कारण आहे. हजारो शिक्षक एकाच वेळी, 25-25 हजार शिक्षण सेवक 3000 रुपयांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये भरले आहेत. 3000 रुपयांवर ते काम करतात. सभापती महोदय, मागील 6 वर्षांची आकडेवारी आपण पाहिली तर यामधून असे लक्षात येईल की, या शिक्षण क्षेत्रामध्ये जी काही दुरावस्था निर्माण झाली असे शासनाचे म्हणणे आहे त्याला शिक्षण सेवक योजना पूर्णपणे जबाबदार आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा आपण पाहतो, महाराष्ट्रामध्ये एकाच ठिकाणी एकाच वेळी शिक्षकांची भरती होईल व स्थानिक आणि बाहेरचे अशा सर्वांना समान संधी मिळेल. आज आदिवासी भागात, ग्रामीण भागात, डोंगराळ आणि दुर्गम भागात शहरी विभागातील मेरीटमधील मुले अजिबात जात नाहीत. म्हणून स्थानिक शिक्षक नेमणे हा गुणवत्ता विकासाचा चांगला मार्ग आहे. वाड्या व वस्त्यांमध्ये त्या भागातील शिक्षक नेमणे, जव्हार भागामध्ये जव्हार भागातील शिक्षक नेमणे, मोखाडा भागामध्ये काम करण्यासाठी त्याच भागातील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

स्थानिक शिक्षक नेमणे यामुळे निश्चितच चांगले परिणाम होऊ शकतात. आज प्राथमिक शाळांमध्ये जी दुरावस्था निर्माण झाली आहे, मग ती वर्गखोल्यांची देखील असेल. 50 टक्के शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. 50 टक्के शाळांमध्ये विजेचा पुरवठा नाही. 50 टक्के शाळांमध्ये स्वच्छतागृहाची आणि अन्य सोयी-सुविधा विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी आवश्यक आहेत त्यांची पूर्तता शासनाने केलेली नाही. ही व्यवस्था केलेली नसतानाही केवळ या अप्रगत विद्यार्थ्यांसाठी फक्त शिक्षकांना झोडपून काढणे, त्यांना जबाबदार धरण्याचा जो शासनाचा प्रयत्न आहे तो पूर्णपणे चुकीचा आहे. सभापती महोदय, मराठी माध्यमाच्या शाळांची दुरावस्था सुरु आहे. आज महाराष्ट्रात मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. मुंबई शहरामध्ये गेल्या 5 वर्षात किमान 450 ते 500 मराठी माध्यमाच्या तुकड्या बंद झाल्या आहेत. मराठी माध्यमाच्या तुकडया बंद झ ााल्यामुळे हजारो शिक्षक आज अतिरिक्त ठरले आहेत. एक तर नवीन तुकडी मंजूर केली जात नाही. नवीन शाळांना परवानगी दिली तर कायम विनाअनुदान तत्वावर दिली जाते. अनुदानित शाळांमध्ये मराठी माध्यमांच्या तुकड्या बंद पडतात. त्याला कारण म्हणजे त्या भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करणे हे आहे. गरज नाही त्या ठिकाणी नवीन मराठी माध्यमाच्या शाळा सुरु झाल्या की आपोआप स्पर्धा सुरु होते. मी याठिकाणी नागपूरचे उदाहरण देतो. एका शाळेमध्ये तुकडी वाचविण्यासाठी संबंधित संस्था चालकांसाठी पालकांना पैसे द्यावे लागत होते. आज परिस्थिती बदलली आहे. आमच्या शाळेत प्रवेश घ्या म्हणून आज संस्था चालक पालकांना पैसे देतात. नागपूरच्या 42 विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला. एका-एका पालकाला प्रवेशासाठी 500 रुपये संस्था चालकांनी दिले. एका महिन्याने हेच विद्यार्थी शाळेत आले आणि तुमचा दाखला द्या असे सांगू लागले आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आम्हाला आता दुस-या शाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे, आम्हाला आता तुमच्या शाळेत शिकायचे नसून दुस-या शाळेत आम्हाला 600 रुपये, रेनकोट तसेच बाकीचे साहित्य मिळणार आहे त्यामुळे आता आम्हाला तुमच्या शाळेत शिकायचें नाही असें विद्यार्थी आता सांगायला लागले आहेत अशी परिस्थिती मराठी माध्यमाच्या शाळेत निर्माण झालेली आहे. आज विद्यार्थ्यांमध्ये जी "अन हेल्दी" स्पर्धा सुरु झालेली आहे ती शासनानेच जाणीवपूर्वक सुरु केलेली आहे. माननीय महोदय अनेक वेळेला सांगत असतात की, ज्या शाळेची गुणवत्ता चांगली असेल ती शाळा टिकेल. परंतु सभापती महोदय, यासंदर्भात आपण बाकीच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या संदर्भात विचार करणार आाहत की नाही ? सभापती महोदय, महाराष्ट्रात मराठी शाळा टिकल्याच पाहिजेत. मी आज एका वर्तमान पत्रात वाचले की, जर्मनी येथील एका शाळेला "रविंद्रनाथ टागोर" नाव दिलेले आहे तसेच या शाळेमध्ये जवळ जवळ 1000 विद्यार्थी शिक्षण घेत असून त्या ठिकाणी 65 शिक्षक आहेत. म्हणजे साधारणत: 15 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे त्या ठिकाणचे प्रमाण आहे. परंतु आपल्याकडे मात्र एका एका शाळेत 70-70, 80-80 विद्यार्थी असतात व या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी एक शिक्षक असतो. त्यामुळे कोठे 15 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक आणि कोठे 80 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक याचा कधी आपण विचार करणार आहात की नाही ? 80 विद्यार्थ्यांना जर एक शिक्षक शिकवित असेल तर तो एक शिक्षक या 80 विद्यार्थ्यांकडे कसे काय लक्ष देऊ शकेल त्यामुळे या गोष्टीकडे शासनाने गंभिरतेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. मराठी शाळा या कोणत्याही परिस्थितीत टिकल्याच पाहिजेत. मराठी शाळा टिकण्यासाठी जे जे काही करता येईल ते ते करण्याची आज गरज आहे. आज या शिक्षणाच्या प्रस्तावर सन्माननीय सदस्य आपले विचार व्यक्ती करतील आणि त्यावर माननीय शालेय मंत्री उत्तर देतील परंतु या उत्तरामध्ये ठोस अशी भूमिका, ठोस असा निर्णय काहीही राहणार नाही. त्यामुळे शासनाने मुळमुळीत उत्तर न देता मराठी शाळा चांगल्या प्रकारे वाढतील यासंदर्भात ठोस असे उत्तर द्यावे अशी मी माननीय मंत्रीमहोदयांकडून अपेक्षा करतो. अगोदर आपण गुणवत्तेनुसार तुकडया कराव्यात असा निर्णय घेतला होता परंतु आता आपण गुणवत्तेनुसार तुकडया करु नये असा निर्णय घेतलेला आहे. शाळेमध्ये आता नको तेवढा हस्तक्षेप चालला आहे. शाळेचे मुख्याध्यापक, संचालक हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या विकासाचा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

ध्यास घेवून काम करीत असतात. आपण काय करतो आहोत याची मुख्याध्यापक, संचालक आणि शिक्षकांना चांगली जाणीव असते. परंतु विद्यार्थ्यांवर आणि शिक्षकावर अन्याय होईल अशा पध्दतीने जर आपण निर्णय देणार असाल तर ते चांगले होणार नाही. केवळ आमच्या मर्जीनुसार तुकडया कराव्यात, आमच्या मर्जीनुसार सर्व चालले पाहिजे, आम्ही म्हणतो तेच योग्य अशा प्रकारचे निर्णय जर आपण घेतले तर ते योग्य होणार नाही. विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तीभेद असू नये, सर्व विद्यार्थी समान असावे असे आम्ही सुध्दा मानतो. माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, "देशाच्या विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, परंतु सध्या राज्यभर सुरु असणा-या विविध विनाअनुदानित शाळांनी गोंधळ निर्माण केला आहे. या विनाअनुदानित शाळा प्रामुख्याने समाजातील चुकीच्या घटकांच्या ताब्यात आहेत. ते लोक या शिक्षण संस्थांचा आपल्या स्वार्थासाठी उपयोग करतात. येथे शिकणा-या विद्यार्थ्यांबद्दल तसेच शिक्षकांबद्दल त्यांना कोणतेच देणे घेणे नसते, ही खरी परिस्थिती आहे. त्यामुळे या विकृत लोकांना व अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी अशा विनाअनुदानित शाळांना वेळीच पायबंद घालण्याची गरज आहे. त्याचबरोबर शिक्षण सेवकसुध्दा ही एक चुकीची संकल्पना आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून राज्याची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी या दोन्ही बाबीसंबंधी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन यावर लवकरच ठोस निर्णय घेणार असल्याचे" शिक्षण राज्यमंत्र्यांचे म्हणणे आहे. असे चित्र, अशी भूमिका शासनाची असून अशा अपप्रवृत्तींना, संस्था चालकांना शासनाने पाठीशी घातले तर ते योग्य होणार नाही. सभापती महोदय, राष्ट्रीय शिक्षण संस्था, नागपूरच्या संदर्भातील मुद्दा चारवेळा या सभागृहात उपस्थित झालेला होता. या शाळेत कोणकोणते गैरप्रकार चालतात याची माननीय मंत्रीमहोयांदयांना चांगली कल्पना आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मेते.......

अद्याप त्या संस्थावर कारवाई झालेली नाही. परंतु त्या संस्थेला बक्षिस म्हणून आणखी 2-3 शाळा काढण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. म्हणजे ज्या संस्थांवर कारवाई करावयास पाहिजे त्या संस्थांवर कोणत्याही प्रकारची कारवाई न होता त्या संस्थेला आणखी 2-3 शाळा काढण्याची परवानगी सरकारने दिलेली आहे.

सभापती महोदय, ठाणे येथील भाविका विद्यालयात संस्थाचालकांची अरेरावी सुरु आहे. तेथील संचालक शिक्षकांना दम देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे त्या ठिकाणचे आमदार आहेत त्यांना याबाबतची कल्पना असेल. अशाप्रकारचे वर्तन करणाऱ्या संस्थाना बी.एड. डी.एड, कला व वाणिज्य महाविद्यालय सुरु करण्याचे बक्षिस शासनातर्फे देण्यात येत आहे. ज्या संस्थावर कारवाई व्हावयास पाहिजे अशा संस्थाना शासन संरक्षण देण्याचे काम करीत आहे. तेव्हा याचा गंभीरतेने विचार व्हावयास पाहिजे.

सभापती महोदय, शासनाचे शिक्षणाक्षेत्राकडे पूर्णत: दुर्लक्ष झालेले आहे. आज शिक्षण संचालकांच्या चार पदांपैकी तीन पदे रिक्त आहेत. शिक्षण सेवा संचालकांच्या 17 पदांपैकी 11 पदे रिक्त आहेत. उपसंचालकाच्या 34 पदांपैकी 13 पदे रिक्त आहेत. शिक्षण अधिकाऱ्यांच्या 159 पदांपैकी 28 पदे रिक्त आहेत. गट-बची 250 पदे रिक्त आहेत. शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे दोन-तीन मंडळाचा अतिरिक्त कार्यभार आहे. तेव्हा याबाबतीत सुध्दा गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये 1184 शाळा आहेत पण त्यासाठी एकच शिक्षणाधिकारी आहे. रायगड जिल्ह्यात 400 शाळा आहेत व त्यासाठी एकच शिक्षणाधिकारी आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर शाळा असताना फक्त एकच शिक्षणाधिकारी कसे काय काम करणार ? तेव्हा या बाबतही गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, शासन प्रौढ शिक्षणावर 9 कोटी रुपये खर्च करते. आज प्रौढ शिक्षणावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याची आवश्यकता आहे काय ? आम्ही प्राथमिक शाळेत शिकत असताना ग्रामसभा व्हावयची त्यावेळी हा विषय कानावर यायचा. आता प्रौढ शिक्षणाची आवश्यकता आहे काय ? याचा शासनाने फेरविचार करावा असे वाटते. याठिकाणी काम करणारा जो वर्ग आहे तो प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाकडे वळविला पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

सभापती महोदय, उच्च माध्यमिक शिक्षणाबाबत बोलावयाचे झाले तर ग्रामीण भागात प्रत्येक तालुक्यात एक महाविद्यालय सुरु करण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. ग्रामीण भागातील गरीब व कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे हा त्यामागील हेतू आहे. परंतु काही तालुक्यांमध्ये जी कायम विनाअनुदानीत महाविद्यालये सुरु झालेली आहेत ती महाविद्यालये शासनाने अनुदानीत करण्याची गरज आहे. कारण गरीब व कष्टकरी शेतकऱ्यांना महाविद्यालयांची फी परवडत नाही. फक्त 7 टक्के विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उर्वरित 93 टक्के विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित आहेत. तेव्हा याचा देखील शासनाने गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शासनाने महात्मा फुले योजना व अन्य योजना सुरु केलेल्या आहेत. अशाप्रकारे शासनाने जे कुरण तयार केले आहे ते बंद करावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, कला शिक्षकांच्या बाबतीत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आज कला शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत नाही. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने कला शिक्षकांची नियुक्ती लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे ( अमरावती विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज शिक्षणक्षेत्रामध्ये अभूतपूर्व गोंधळ सुरु आहे. याचे कारण म्हणजे शासनाचे शिक्षणाच्या बाबतीत जे धोरण आहे त्या धोरणामध्ये होणारे बदल हे आहे. या सर्व बदलांमुळे हा परिणाम दिसून येत आहे. सभापती महोदय, एकाच शाळेमध्ये तीन प्रकारचे शिक्षण दिले जाते. एक विनाअनुदानीत, दुसरे अनुदानीत आणि तिसरे कायम विनाअनुदानीत. संस्थेच्या एकाच शाळेत जर असा भेदभाव होत असेल तर त्याठिकाणी कशाप्रकारचे शिक्षण मिळत असेल याचा विचार केला पाहिजे. एकाच शाळेतील काही विद्यार्थ्याला पुस्तके मिळतात,

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित... 13:15

श्री.वसंतराव खोटरे...

परंतु काही विद्यार्थ्यांना पुस्तके मिळत नाहीत, त्यांना सोयी सवलतीही मिळत नाहीत. अनुदानित शाळांतील मुलांना स्कॉलरशीप, परीक्षा शुल्क मिळते. परंतु कायम विना अनुदानित शाळांतील मुलांना काहीच मिळत नाही, अशा प्रकारचा भेदभाव एकाच शाळेत होत असेल तर ते योग्य नाही. आज अशा प्रकारचे असंतोषाचे वातावरण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाले आहे. मागच्या काळात माननीय श्री.अमरीशभाई पटेल साहेब शिक्षण मंत्री असताना त्यांनी सर्व मुलांना मोफत पुस्तके देण्याची घोषणा केली व त्याप्रमाणे मुलांना पुस्तकांचे वाटपही करण्यात आले. मात्र मागच्या वर्षीपासून यामध्ये बदल करण्यात आला. त्यामुळे याबाबत माझी मागणी आहे की, आपण राज्यातील सर्व मुलांना मोफत पुस्तके द्यावीत.

सभापती महोदय, शाळा सुरु करण्याच्या तारखेबाबत अनेक मान्यवर याठिकाणी बोलले. याठिकाणी आपण 12 जूनला शाळा सुरु करण्याचा जो निर्णय घेतला तो अतिशय दुर्दैवी आहे. कारण स्वातंत्र्यापासून आजपर्यंत यामध्ये कुठल्याच प्रकारचा बदल करण्यात आला नव्हता. त्यामुळे पूर्वीचा जो शाळा सुरु करण्याबाबतचा निर्णय होता, तो अतिशय योग्य होता. हवामानाचा अंदाज, भौगोलिक परिस्थितीचा विचार करुनच प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत एक जुलै ही तारीख ठरली होती. परंतु यामध्ये आपण बदल केल्यामुळे विदर्भातील अनेक विद्यार्थी, अनेक शिक्षक हे संकटात सापडलेले आहेत. याबाबतीतील धोरण पूर्वीच ठरलेले असून यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल न करता, जे कामाचे तास आहेत तेच तास आपण चोखपणे बजवावेत. आज शिक्षकांवर अन्याय करण्यात येतो. अनेकवेळा शिक्षकांवरच आरोप केले जातात की, महाराष्ट्रामध्ये 8 लाख मुले अप्रगत आहेत, याबाबतीत आपण याउलट विचार वा याबाबतीत गणित का मांडत नाहीत. आपण प्रत्येकवेळी शिक्षकांनाच दोषी धरता की, शिक्षक काहीच करत नाहीत. परंतु हे म्हणणे बरोबर नाही. याबाबतीत आपण शिक्षणाधिकारी वा त्यांच्या खालच्या अधिकाऱ्यांनाही चांगले काम करण्यास सांगावे, त्यांचेही आपण गुणदोष पहावे. तसेच, याठिकाणी मी सांगू इच्छितो की, सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षकांना जे प्रशिक्षण दिले जाते, त्याची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही वा आपल्याला ती करता येत नाही. सन 2004-2005 मध्ये ज्यावेळी प्रशिक्षण झाले त्यावेळी अगोदर शिक्षकांना याबाबतीत काहीच माहिती नव्हती. ऐनवेळी शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षकांना या-या केंद्रावर प्रशिक्षणासाठी जा, असे सांगितले. प्रशिक्षणास एकाच शाळेतील सर्व शिक्षक गेले. परंतु प्रशिक्षण

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे...

केंद्रावर कुठल्याही प्रकारची सुविधा वा व्यवस्था नव्हती. त्याठिकाणच्या मुख्याध्यापकांनाही याबाबतीत काहीच माहिती नव्हती. त्याठिकाणी शिक्षक प्रशिक्षणासाठी गेल्यानंतर अशा प्रकारचा गोंधळ असल्याची काही शिक्षकांनी मला फोनद्वारे माहिती दिली. याबाबतीत मी शिक्षणाधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, शिक्षणाधिकारी हजर नसल्याचे दिसून आले व उप शिक्षणाधिकारी यांनाही याबाबतीत काहीच माहिती नसल्याचे दिसून आले. त्यामुळे असे जे प्रकार चालू आहेत, ते योग्य नाहीत. आज या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शासनाचा लाखो रुपयांचा चुराडा होत असतो. त्याठिकाणी प्रशिक्षण देण्यासाठी तज्ज्ञ लोकही उपस्थित नव्हते. त्यावेळी प्रशिक्षणासाठी आलेल्या जेष्ठ शिक्षकाच्या माध्यमातून, ज्याला चांगल्या प्रकारचा अनुभव व माहिती आहे अशा शिक्षकाच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले असते तरी चालले असते. अशा प्रकारे त्यावेळी 15-20 दिवस ट्रेनिंग झाले, परंतु त्यावेळी कुठल्याही प्रकारे मानधन वा वहया-पुस्तके त्यांना पुरविण्यात आल्या नव्हत्या. अशा प्रकारे सर्व शिक्षा अभियांतर्गत अतिशय मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे, याबाबतीत मी शिक्षक प्रशिक्षण संचालक, पुणे यांचेकडे तक्रारही केली. संपूर्ण राज्यातील मुलांसाठी व शिक्षकांसाठी जे 250 कोटी रुपये येतात, ते पैसेही त्यांना दिले जात नाहीत. ट्रेनिंगच्यावेळी शिक्षकांच्या सहयाही घेण्यात आल्या होत्या. परंतु याबाबतीत जिल्हा परिषदेच्या शिक्षक तक्रार करत नाहीत, कारण ते बदली होईल या भीतीने बोलत नाहीत. त्यावेळी खाजगी शाळांतील शिक्षकांनी ट्रेनिंग घेतली. त्यानंतर अकोला जिल्हयातील शिक्षकांना त्यांच्या मानधनाचा पैसा मिळाला.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव कोठरे...........

संचालक, शिक्षण-प्रशिक्षण यांनी पुण्यावरुन 2 महिला अधिका-यांना अकोट येथे चौकशीसाठी पाठविले होते. या महिला अधिका-यांनी चौकशी केल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, अकोट तालुक्यामध्ये शिक्षकांना मानधन देण्यात आले नव्हते. नंतर यासंदर्भात तक्रार झाल्यामुळे त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आली होती. वाशिम जिल्हयामध्ये सुध्दा प्रशिक्षणासंबंधीचे रुपये 4500 चे मानधन मिळालेले नाही. नागपूर विभागामध्येही मानधन मिळालेले नाही. अशाच प्रकारच्या तक्रारी अनेक जिल्हयातील आहेत. अजूनही वाशिम जिल्हयातील शिक्षकांना मानधन दिले गेलेले नाही. मग जर अशा प्रकारे शिक्षकांना मानधन दिले गेले नसेल तर हे पैसे गेले कुठे ? असा प्रश्न निर्माण होतो व यासंदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा, अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, शासनाकडून अनेक शासन निर्णय, परिपत्रके काढली जातात. परंतु, यामार्फत दिल्या जाणा-या सूचना वेळेवर दिल्या जात नाही. त्यामुळे अनेक योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही, अशा प्रकारचा मुद्दा अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे, त्यामुळे याविषयी जास्त बोलून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. या सर्व मुद्यांसंदर्भात विचार करुन शासनाने आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, एवढी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

------------

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज शिक्षण या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या चर्चेचा उत्तराचा दिवस असल्याने मला महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेकडून प्राप्त झालेल्या तातडीच्या फॅक्सची माहिती माननीय मंत्रीमहोदयांना द्यावयाची असल्यामुळे मी या ठिकाणी उभा राहिलो आहे. सभापती महोदय, या फॅक्समधील महत्वाचा मुद्दा असा आहे की, 6 ते 7 हजार शिक्षकांना पगार मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आलेली आहे, अशा प्रकारची ही घटना आहे. त्याचे कारण असे आहे की, सन 1999 मध्ये टप्पा अनुदान निकषावर महाराष्ट्रात 3937 तुकडयांना 5 वी ते 10 वी वर्ग तुकडयांना मान्यता देण्यात आली होती. शासनाच्या नियमाप्रमाणे सन 2004 साली 20 टक्के अनुदान प्राप्त होणे अभिप्रेत आहे. परंतु, गेल्या दोन वर्षापासून त्या वर्ग तुकडयांना अनुदान प्राप्त झालेले नाही. म्हणून दि.20 मार्च 2006 रोजी शिक्षण राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी सभागृहात या वर्ग तुकडयांना अनुदान जाहीर केले. परंतु, अद्यापही त्याबाबतीत शिक्षण विभागाला कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत. तसेच, शासनाने अनुदानीत शाळांना टप्पा अनुदान जाहीर केले आहे. परंतु, अद्यापही आर्थिक तरतूद झालेली नाही. साधारण अशा शाळेतील राज्यातील शिक्षकांची संख्या 17000 ते 20000 शिक्षक एवढी आहे. त्यांनी विनंती केली आहे की, हे दोन्ही प्रश्न निकाली काढण्याकरिता सर्व शिक्षक सदनाच्या सोबत आहेत. त्यांनी त्यांचा प्रश्न आवर्जुन मांडावा अशी विनंती मला केलेली असल्यामुळे मी माननीय मंत्रीमहोदयांच्या समोर ही विनंती मांडीत आहे. धन्यवाद.

**तालिका सभापती (श्री.विनोद तावडे)** : सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भातील खुलासा मंत्रीमहोदयांनी आपल्या भाषणात करावा.

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, शिक्षण विभागावर उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेत आदरणीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते आणि इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्याबद्दल सर्वप्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. मी मंत्री झाल्यानंतर मला वाटते पहिल्यांदाच चार, साडेचार तास या विषयावर झालेली आहे. या चर्चेमध्ये प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण अशा सर्व शिक्षण क्षेत्रासंबंधी चर्चा झाली. उच्च व तंत्र शिक्षणासंबंधी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या भाषणात काही मुद्दे उपस्थित केले आहेत. परंतु, मला वाटते सर्वात जास्त चर्चा ही प्राथमिक शिक्षणासंबंधी झालेली आहे. प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा पाया असून तो जर चांगल्या दर्जाचा असेल तर त्यावरील सर्व टप्प्यातील शिक्षण हे मजबूत होऊ शकते.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ........ 13:25

श्री.सुरेश शेट्टी ..........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी फिशरीज युनिर्व्हसिटीसंबंधी मुद्दा उपस्थित केला. फिशरिज या विषयामध्ये स्पेशलाईजेशनसाठी महाराष्ट्रामध्ये दोनच कॉलेजेस आहेत. मला असे वाटते की, केवळ दोन कॉलेजेससाठी एवढया मोठया प्रमाणावर पैशांची गुंतवणूक करुन नवीन विद्यापीठ काढणे योग्य होणार नाही. त्याऐवजी कोकणामध्ये फिशरीज आणि ॲनिमल हजबंडरीजच्या नवीन संस्था स्थापन करण्याचा आपण निश्चित प्रयत्न करु.

दुसरा महत्वाचा मुद्दा फिल्म इंडस्ट्री, फिल्म प्रोडक्शनबाबत उपस्थित करण्यात आला. फिल्म इंडस्ट्री आणि फिल्म प्रोडक्शन हा महत्वाचा उद्योग आता सुरु झालेला आहे. मुंबई युनिर्व्हसिटीने ऑलरेडी मास मिडीयाचे डिपार्टमेंट स्टार्ट केलेले आहे. मला असे वाटते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत जे फिल्म प्रोडक्शन रिलेटेड कोर्सेस असतात मग ते मेकअप असो, लायटिंग असो, एडिटिग असो, रेकॉर्डिग असो, म्युझिक रेकॉर्डिंग असो या विषयांसाठी एक वर्षाचा शॉर्ट टर्म कोर्स सुरु करता येईल किंवा कसे, याबाबतचा अभ्यास करुन हे कोर्सेस सुरु करण्याचा निश्चित प्रयत्न करण्यात येईल.

ग्रॅन्ट मेडिकल कॉलेज आणि जे.जे.हॉस्पिटलसंबंधी या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारला शिफारस केली होती. त्या शिफारशीनुसार प्रधानमंत्री स्वस्थ सुरक्षा योजनेंतर्गत मुंबईतील ग्रॅन्ट मेडिकल कॉलेज आणि जे.जे.हॉस्पिटलसाठी केंद्र शासनाने 100 कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. महाराष्ट्र शासनाला हेल्थ मिनिस्ट्रिकडून 23 जून, 2006 रोजी पत्र प्राप्त झाले असून या पत्रात आरोग्य विभागाचे सेक्रेटरी श्री.प्रसन्ना खोटा यांनी आम्हाला असे कळविले आहे की, " I am happy to inform you that the Government of India has approved the up-gradation of Grant Medical College and Sir J.J.Group of Hospitals, Mumbai of your State under Pradhan Mantri Swasthya Suraksha Yojana. As you are aware, out of Rs.120 crores outlay sanctioned for up-gradation of each institute, the Central Government will invest Rs.100 crores as a one time measure and remaining capital expenditure of Rs.20 crores will have to be borne by the respective State Governments." मागच्या अधिवेशनामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी मुंबई हॉस्पिटलसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

GRB/ KGS/ MAP/     प्रथम श्री.रोझेकर ........     13:25

श्री.सुरेश शेट्टी ..........

20 कोटी रुपयांची मागणी केली होती. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये जाहीर केले होते की, एम.एम.आर.डी.ए. मधून जे.जे. हॉस्पिटलसाठी देऊ निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. या योजनेनुसार 20 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाचे कॉन्ट्रिब्युशन असेल आणि केंद्र शासनाकडून 100 कोटी रुपये मिळालेले आहेत. मला असे वाटते की, मुंबईच्या जे.जे.हॉस्पिटलसंबंधी भविष्यात बोलावयाचे झाले तर It will be one of the premier Health Institute in the State of Maharashtra. मी केंद्र शासनाला धन्यवाद देऊ इच्छितो की, त्यांनी आमची विनंती मान्य केली. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी साहेबांनी डॉ.आंबेडकर युनिर्व्हसिटीमधील रिक्रुटमेंटच्या करप्शनसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. मागच्या अधिवेशनामध्ये यासंबंधी चर्चा झाली होती. आम्ही व्हाईस चान्सलर यांना आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी निवृत्त न्यायाधीश श्री.माने यांचा अहवाल मान्य केला आहे. याबाबत त्यांनी कोणती कारवाई केलेली आहे याची माहिती घेऊन मी ती आपल्याला दोन दिवसांमध्ये देतो. रामानंदतीर्थ युनिर्व्हसिटी, नांदेड संबंधी काही मुद्दे मांडण्यात आले. मी युनिर्व्हसिटीमधून माहिती घेऊन ती माहिती सभागृहाला देईन. बी.एड्. संबंधी मुद्दा उपस्थित करण्यात आला. बी.एड्. चे यावर्षी सी.ई.टी. परीक्षेची फायनल लिस्ट 20.7.2006 ला लागणार आहे. 13 तारखेला कौन्सिलिंग ठेवलेले आहे. बी.एड.च्या 30 हजार सीटस् महाराष्ट्रामध्ये आहेत. 92 हजार विद्यार्थ्यांनी सी.ई.टी.मध्ये ॲपिअर केलेले आहे. आजपर्यंत कोठेही गोंधळ झाल्याची एकही तक्रार आमच्याकडे आलेली नाही.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

अशी काही आपल्याकडे स्पेसिफिक प्रकरणे असतील तर ती आपण माझ्याकडे दिल्यास जरूर त्याबद्दल चौकशी करून आम्ही आपल्याला माहिती देऊ. ...

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, बीएडच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना मॅनेजमेंट कोट्यातील प्रवेशासंबंधात मी आपल्याला विचारले होते.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, खाजगी विनाअनुदान तत्त्वावरील संस्थांमधील मॅनेजमेंट कोटा भरण्यासाठी देखील त्यांना सीइटी घेऊन मेरिटनुसारच जागा भराव्या लागतात. तरीही आपल्याकडे या संबंधात काही माहिती असल्यास आपण ती आमच्याकडे दिल्यास त्यासंबंधात चौकशी करून जरूर कारवाई आपण करू इतकेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो. सभापती महोदय, शिक्षणाचे सर्वसाधारण स्टँडर्ड आणि इंजिनिअरींग कॉलेजातील शिक्षणाची पातळी खाली जात आहे असा एक मुद्दा येथे मांडण्यात आला. यासाठी आपण नॅशनल ॲक्रिडेशन ॲण्ड असेसमेंट कमिटी स्थापन केली आहे. आपल्या महाराष्ट्रात असलेल्या 1452 पैकी 483 विनाअनुदान संस्था आहेत आणि त्यातील 932 संस्थांनी ॲक्रिडेशन घेतले आहे. बाकीची कॉलेजेस आहेत त्यांनाही आम्ही सांगितले आहे की, त्यांनीही ॲक्रिडेशन घ्यावे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी बोर्ड ऑफ स्टडीज् आणि बोर्ड ऑफ एक्झामिनेशन या संबंधात मुद्दा मांडला. पण त्याचीही आपली नेहमीची प्रोसिजर आहे. त्यावर कोण सदस्य आहेत कोण नाहीत याबद्दल त्यांचेकडून गाईडलाईन्स दिल्या आहेत. त्यात आपल्याला काही चूक झाल्याचे निदर्शनास आले असेल तर विद्यापीठाकडून माहिती मागवून घेऊन ते आम्ही तपासून घेतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, बोर्ड ऑफ स्टडीज् हे परीक्षांचे पेपर्स काढते म्हणजे सेट करते आणि बोर्ड ऑफ एक्झामिनेशन हे परीक्षा कंडक्ट करते. पण त्यावर जे कोणी सदस्य आहेत, त्यांचे जे पॅनल आहे ते दर तीन वर्षांनी बदलले गेले पाहिजे. वर्षानुवर्षे तेच ते सदस्य तेथे राहतात आणि त्यामुळे त्यांचे तेथे एक मोठे रॅकेट झालेले आहे त्याचा उल्लेख मी केला आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, विद्यापीठाच्या परीक्षांचे पेपर्स सेट करणे वगैरे काम बोर्ड ऑफ स्टडीज् करीत असते आणि परीक्षांचे मॉनिटरींग करण्याचे काम बोर्ड ऑफ एक्झ ाामिनेशन करीत असते. या दोन ॲथॉरिटीज परीक्षांचे पेपर्स काढणे तसेच परीक्षा बरोबर होत

....... एस 2 ...

आहेत की नाही हे बघण्याचे काम करीत असतात. या बद्दल आपल्या काही सूचना असतील तर जरूर आपण आम्हाला सांगितल्यास त्याप्रमाणे आम्ही सुधारणा करण्याचा प्रयत्न करू.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी मध्यंतरी मुंबईतील विल्सन कॉलेजमधील प्रोफेसरच्या तोंडाला विद्यार्थी संघटनेच्या लोकांनी काळे फासले त्याबद्दलचा मुद्दा येथे उपस्थित केला आहे. या प्रकरणी पोलीस चौकशी करीत आहेतच. तसेच त्यासंबंधात मी देखील सदर कॉलेजकडून तसेच विद्यापीठाकडून अहवाल मागवून घेतला आहे. विद्यापीठामध्ये आपण एक खास सेल उघडले असूनप त्याद्वारे तेथील महिला विद्यार्थी तसेच कर्मचारी यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या जातात. तशाच प्रकारचे सेल प्रत्येक कॉलेजमध्ये देखील उघडण्यास आपण सांगितले होते. या कॉलेजमध्ये देखील तसा सेल उघडण्यास आपण सांगितले आहे. सध्या या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे आणि यामध्ये गुंतलेल्या विद्यार्थी संघटना आणि त्यांचे पदाधिकारी जे कोणी आहेत त्यांच्या विरूद्ध कारवाई करण्याची प्रोसेस चालू आहे. याबाबतीत आम्ही कॉलेजच्या प्रिन्सिपॉल यांचेकडून तसेच विद्यापीठाकडून अहवाल मागितला आहे. या बाबतीत असे झाले आहे की, एक वर्षापूर्वी विद्यार्थी आणि पालकांनी कॉलेजच्या प्रिंसिपॉलना या घटनेसंबंधात सांगितले होते. त्याचा संपूर्ण रिपोर्ट माझ्याकडे आहे आणि मी स्वतः या घटनेसंबंधात व्ही.सी.कडून अहवाल मागविला आहे. या बाबतीत विद्यार्थी संघटनेच्या लोकांनी चूक केली आहे, ठीक आहे पण कॉलेज मॅनेजमेंट आणि प्रोफेसर आहेत त्यांच्याकडून काही चुका घडल्या आहेत काय हेही पहावे लागेल...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री ज्या पद्धतीने येथे उत्तर देत आहेत त्यातून स्पष्टपणे असे दिसते आहे की, हे प्रकरण आताच घडले आहे असे नाही तर वर्ष दोन वर्षापूर्वी घडलेले हे प्रकरण आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... टी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

आणि त्या प्रकरणाला हवा देऊन त्या प्राध्यापकांना बदनाम करण्यासाठी हा सर्व प्रकार घडवून आणला आहे. हा प्रकार घडविण्यामध्ये बाहेरचे लोक सामील झाले होते. त्या प्रकरणाची आपण माहिती घ्यावयास पाहिजे होती. शासन म्हणून आपली ती जबाबदारी आहे. शिक्षण खात्यामध्ये अशाप्रकारे गोंधळ व्हावयास लागला आहे. पाठीमागचे जुने प्रकरण काढून त्या प्राध्यापकांच्या तोंडाला काळे फासणे योग्य नव्हते. त्याबाबत शासन तत्परतेने त्या संबंधित लोकांवर कारवाई करणार आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये दोन भाग आहेत. एक भाग असा आहे की, त्या विद्यार्थिनीने प्रिन्सिपल यांच्याकडे व महिला आयोगाकडे देखील तक्रार केली आहे. प्रिन्सिपल यांनी या संदर्भात दिलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे. " A gentleman named Dr. Balmure....." आवश्यक असल्यास तो अहवाल मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री.पांडरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. त्या प्राध्यापकाविरुध्द केव्हां तक्रार आली होती या प्रश्नाचे उत्तर आले नाही?

श्री. सुरेश शेट्टी : ऑगस्ट 2005 मध्ये आली होती. प्रिन्सिपल यांच्याकडे तक्रार करण्यात आल्यानंतर त्यांनी पालक आणि विद्यार्थी यांना घेऊन त्यासंबधीचा अहवाल तयार केला. It reads as under: "The father claimed that Dr.Athawale was showing more interest than required in his daughter's progress and wanted it to stop. Prof. Parkar, Vice-Principal offered to look in the matter and to brief the Principal. The father met the Principal the next day and the Principal agreed to inquire into the matter, Prof. Nerurkar was also present. On Septermber, 2005, the father came again on Prof.Parkar's phone call, and had cordial discussion over a cup of tea. The Principal suggested that if the father desire to take away the girl from college and take admission elsewhere, the College will cooperate by giving them Leaving Certificate.



सुरेश शेट्टी....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

At this point of time, the father clearly stated that it is not that serious matter but requested to take appropriate action."

Sir, there is a case in favour of the student. I do not support what the Student Organization did, even though; I come from that particular Organization. I am taking a very strong view and objection on this point and action will be taken on the Office bearers, if they are found guilty and action will also be taken against the concerned Professor, if he is found guilty.

I have done, Sir. Thank you.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझ्या एका प्रश्नाचे उत्तर आले नाही...

**तालिका सभापती** : आपल्याला हा विषय वेगळया पध्दतीने उपस्थित करता येईल. आता माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी भाषण सुरु करावे.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय,...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे उत्तर ऐकावयाचे नाही. सन्माननीय हायकोर्टाने निर्णय दिला आहे. त्या संदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांनी याठिकाणी आपली भूमिका मांडून सन्माननीय हायकोर्टाचा अपमान केला आहे. त्यामुळे त्यांनी आपला राजीनामा दिला पाहिजे अशी आमची मागणी आहे. त्यांच्याऐवजी माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी उत्तर देण्यास आमची हरकत नाही. 1459 शाळांच्या संदर्भात शिक्षण क्षेत्रामध्ये आरोप झाले असल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. त्यांचे उत्तर आम्हाला ऐकावयाचे नसल्यामुळे त्यांनी दुसऱ्या मंत्र्यांना उत्तर देण्यास सांगावे...

(गोंधळ)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, परवाच्या दिवशी नागपूर हायकोर्टाच्या खंडपिठाने राज्यातील जवळपास साडे चौदाशे शाळांची मान्यता रद्द केली. या शाळांना मान्यता देतांना त्यामध्ये गैरव्यवहार झाला आहे, निकष पाहून शाळांना मान्यता दिलेली नाही, त्यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे अशाप्रकारचे आरोप केले आहेत. त्यामुळे या प्रकरणामध्ये राज्य शासनाला दोषी धरुन त्या शाळांची मान्यता रद्द केली आहे, व तसे पत्र त्या शाळांना दिले गेले आहे. आणि राज्य शासनाने घेतलेला निर्णय हायकोर्टाने अमान्य केला आहे. यामध्ये भ्रष्टाचाराचा वास असल्यामुळे आणि राज्य शासनाच्या शिक्षण खात्याला जबाबदार धरले असल्यामुळे माननीय शिक्षण मंत्र्यांनी याठिकाणी उत्तर

श्री. पांडुरंग फुंडकर....

देणे संयुक्तिक नाही. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा माननीय मुख्यमंत्र्यांकडे दिला पाहिजे. हायकोर्टाने जो निर्णय दिला आहे त्यावर मल्लिनाथी माननीय शिक्षण मंत्र्यांनी याठिकाणी केली आहे. कायदेशीररित्या त्यांनी तशाप्रकारचा खुलासा याठिकाणी करणे बरोबर आहे कां? हे सर्व प्रकरण तपासून पाहिल्यानंतर माननीय शिक्षण मंत्र्यांनी याठिकाणी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. त्यांनी या चर्चेला उत्तर देता कामा नये. या सदनामध्ये शिक्षणावर साडे चार तास सर्वव्यापी अशी चर्चा झाली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 13:40

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

हायकोर्टाने त्यांना दोषी ठरविलेले असून देखील या राज्याचे शिक्षण मंत्री उत्तर देत असतील तर त्यांचे उत्तर आम्ही ऐकणार नाही. त्यांच्या ऐवजी त्या विभागाच्या राज्य मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज जे निवेदन दिलेलेले आहे त्या निवेदनातील चौथा परिच्छेद तपासून पाहिला तर न्यायालयात जी भूमिका मांडली ती कशी ग्राह्य धरली गेली, अशाप्रकारचे निवेदन मंत्रीमहोदयांनी केलेले आहे. आमचा आक्षेप या गोष्टीला आहे की, सगळे निवेदन उच्च न्यायालयात केल्यानंतर सुध्दा न्यायालयाने मंत्रीमहोदयांनी मंजूर केलेल्या शाळा रद्द करुन त्यांना दोषी ठरविले. असे असताना त्यांनी या ठिकाणी निवेदन करण्याची आवश्यकता नव्हती, तशी आपल्या सदनामध्ये प्रथा नाही. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर तो निर्णय ग्राह्य मानायचा, त्याप्रमाणे कृती करायची, अशी पध्दती आहे. त्याचे समर्थन करता कामा नये. यामध्ये म्हटलेले आहे की, "माननीय उच्च न्यायालयाचे माझ्या कृतीतून समाधान झाले असले तरी न्यायालयाच्या आदेशाचा अनादर करण्याची कृती ज्यांच्या हातून घडली असेल "..

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय,...

**तालिका सभापती (श्री.विनोद तावडे)** : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे नंतर आपण बोलावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयावर चर्चा घडवून आणणे योग्य नाही. त्या संदर्भाने या ठिकाणी निवेदन करणे अयोग्य आहे. त्या संदर्भात समाधान व्यक्त केले, अशाप्रकारे सांगून आमच्या डोळ्यात धुळफेक टाकण्याचा प्रयत्न करणे हे अन्यायकारक आहे. काही जरी असले तरी आमची मागणी आहे की, कोणत्याही प्रकारचा सोपस्कर न करता सन्माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात राजीनामा द्यावा. न्यायालयाने दिलेला निर्णय क्षमा करण्यासारखा आहे, अशी परिस्थिती नाही. ती निंदनीय आहे. म्हणून त्याची दखल घेतली जावी, एवढीच विनंती आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे पहाण्याची माननीय शिक्षण मंत्र्यांची जी वृत्ती आहे, ती अत्यंत आक्षेपार्ह आहे. मी अनेकवेळा सभागृहामध्ये सांगितलेले आहे. या निवेदनामध्ये एक वाक्य गमतीदार दिलेले आहे. खरे म्हणजे जीव टाकून 14 अधिवेशने सांगत आहे...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

विवाद्य अशाप्रकारचा उल्लेख या निवेदनामध्ये आहे की, "माझ्याकडे सादर करण्यात आलेल्या कोणत्याही संचिकेतील टिप्पणीमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 11-4-2000 व दिनांक 3-11-2004 च्या आदेशाचा साधा उल्लेखसुध्दा करण्यात आला नव्हता." गेली 10 अधिवेशने सभागृहात सांगत आलो की, विना अनुदानाची सेवा सिलेक्शन ग्रेडसाठी धरली पाहिजे, असा धोरणात्मक निर्णय उच्च न्यायालयाने दिला, हे खरे आहे काय ? त्याला मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. गेली दहा अधिवेशने झाली त्यासबंधात पुजाअर्चाच चालू आहे. शेवटी विश्वास हा वर्तनाने सिध्द होत असतो. मंत्री महोदयांनी सातत्याने अशाप्रकारचे वर्तन केलेले आहे. एक ग्रुप न्यायालयात जाऊन निर्णय घेऊन आला, दुसरा ग्रुप न्यायालयामध्ये जाऊन निर्णय घेऊन आला. असे होणे बरोबर नाही. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी सातत्याने सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी अनादर केलेला आहे. त्यामुळे त्यांनी उत्तर देण्याचा नैतिक अधिकार आपल्याजवळ ठेवलेला नाही, ही त्यांनी परिस्थिती ओळखली पाहिजे.

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : हायकोर्टाच्या निर्णयाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी न्यायालयात जे स्टेटमेंट केले......

**उपसभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय,......

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय हायकोर्टाच्या निर्णयाच्या संदर्भात माननीय शालेय शिक्षण मंत्री यांनी केलेले निवेदन चुकीचे आहे....

**उपसभापती** : या ठिकाणी निवेदनानंतर ही चर्चा घडवून आणलेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावयास पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांचा तो अधिकार आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, आपला आदर ठेऊन मी सांगू इच्छितो. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी माननीय हायकोर्टाच्या निर्णयाच्या संदर्भात जो उल्लेख केलेला आहे तो योग्य आहे. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "मा. उच्च न्यायालयाचे माझ्या कृतीतून समाधान झाले असले तरी..." आपण त्यांना असे सर्टिफिकेट देणार काय ?

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी बराच वेळ हात वर केलेला आहे. मला यावर बोलावयाचे आहे.

**उपसभापती** : मी नाही म्हणत नाही. परंतु माननीय मंत्रिमहोदयांना खुलासा करु द्यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला यावर बोलावयाचे आहे.

**उपसभापती** : निवेदनावर चर्चा झालेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांना खुलासा करण्याचा अधिकार आहे. तो अधिकार त्यांना बजावण्याची संधी द्यावी. माननीय मंत्रिमहोदयाचे उत्तर सन्माननीय सदस्यांचे एकून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना या ठिकाणी बोलता येणार नाही. ते आम्ही ऐकणार नाही.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देण्यास सुरुवात करतात )

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे. माननीय न्यायालयाचा कोणताही अवमान करण्याचा आमचा तीळमात्र हेतू नाही. माननीय न्यायालयाने दिलेला निर्णय आम्हाला 100 टक्के आदरणीय आहे आणि त्याचे 1 टक्काही उल्लंघन करणार नाही. अनावधानाने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

प्रा. वसंत पुरके .....

निवेदनामध्ये काही चूक झाली असेल तर मी सभागृहाची माफी मागतो, दिलगिरी व्यक्त करतो. शिक्षण ही सर्वांगीण विकासाची गंगोत्री आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी एक मुद्दा उपस्थित केला. वरिष्ठश्रेणी आणि निवडश्रेणीच्या बाबतीत जो निर्णय झालेला आहे त्यासंदर्भात 100 टक्के आदर बाळगून निर्णय घेणार आहोत. वरिष्ठश्रेणी आणि निवडश्रेणीच्या संदर्भात कोर्टाने ज्या डायरेक्शन्स दिलेल्या आहेत त्या आम्ही 100 टक्के तंतोतंत पाळणार आहोत. वरिष्ठश्रेणी आणि निवडश्रेणीच्या संदर्भात 4 कोटी 60 लाख रुपयांच्या तरतुदीसाठी कॅबिनेटसमोर आठ दिवसाच्या आत बाब सादर करणार आहोत आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये ती मागणी मंजूर करुन घेणार आहोत. न्यायालयाने दिलेले निर्देश 100 टक्के वंदनीय आहेत. वरिष्ठश्रेणी आणि निवडश्रेणीच्या संदर्भात मी स्वत: जातीने लक्ष देऊन ही मागणी पूर्ण करणार आहे. या निवेदनामध्ये लिहिताना कोणत्याही प्रकारे माननीय न्यायालयाचा अवमान व्हावा असा माझा एक टक्काही हेतू नाही. त्यांचा आदर बाळगून 6 महिन्यात हा बृहत आराखडा आम्ही निश्चितपणे सादर करु.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, श्रीमती कांता नलावडे, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अनिल परब या सर्व सन्माननीय सदस्यांनी अतिशय पोटतिडिकीने आपले विचार मांडले. सर्वसामान्य लोक शिक्षणपासून वंचित राहता कामा नयेत याबाबतीत अतिशय परखड मते त्यांनी मांडलेली आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, या विषयावर सभागृहामध्ये चर्चा व्हावी हे दुर्भाग्य आहे. परंतु मी हे भाग्य समजतो की, इतक्या वर्षानंतर का होईना पण या अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणलेली आहे. शासनाचे काही चुकले असेल. प्रशासकीय यंत्रणेचे काही चुकले असेल. याबाबत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी धेतलेली भूमिका आम्हाला वंदनीय वाटते. सभापती महोदय, जे महत्वाचे प्रश्न निर्माण झालेले आहे त्याबाबत माझे मत मांडणे मी माझे कर्तव्य समजतो. या निवेदनाच्या बाबतीत आमच्याकडून काही तांत्रिक चुका झाल्या असतील परंतु कोर्टाने दिलेल्या निर्णयाचे आम्ही 100 टक्के पालन करु. ज्या त्रुटी राहिलेल्या असतील त्या सहा महिन्यात पूर्ण करु.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:50

(प्रा. वसंत पुरके पुढे सुरु...)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

सभापती महोदय, शाळा मास्टर प्लॅनच्या बाहेर दिल्या गेल्या हे आमच्या लक्षात आले. तेव्हा ही चूक आम्ही दुरुस्त करु. त्यासंदर्भात न्याय व्यवस्थेने आम्हाला परवानगी दिली आहे. त्याबाबतीत निश्चितच योग्य ती कारवाई केली जाईल. मी जे निवेदन सभागृहामध्ये केलेले आहे त्यामध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत. त्याबद्दलही मी सदनाची माफी मागतो. न्यायालयाचा अवमान करण्याची माझी तीळमात्रही इच्छा नाही. राज्यातील सर्व मुलांना, मागासलेल्या मुलांना, एससी,एसटी,व्हीजेएनटीच्या मुलांना शिक्षण मिळावे आणि समाज विकसित व्हावा यादृष्टीने सन्माननीय सदस्यांनी ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत त्या आम्हाला शिरसावंद्य आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे ग्रामीण भागातील कार्यकर्ते आहेत. 12 जूनला शाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यामागे हेतू हाच होता की, शाळा एकाच वेळी सुरु व्हाव्यात, एकाच वेळी युनिट टेस्ट व्हाव्यात, एकाच वेळी महाराष्ट्रातील सर्व मुलांना पुस्तके मिळावीत. 12 जूनला शाळा सुरु करण्यासंबंधी माझ्या शिक्षक बांधवांच्या काही तक्रारी असतीलही. परंतु पालक, पाल्य आणि लोकप्रतिनिधी यांच्या पैकी कोणाचीही 12 जूनला शाळा सुरु करण्याबाबत तक्रार नाही. याठिकाणी एक-दोन मुले मरण पावली असे सांगण्यात आले. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, जूनमध्ये 48 अंश सेल्सियस पेक्षा अधिक उष्णतामान कधीच नव्हते. शेवटी मुलांच्या भवितव्याचा विचार करुन, मुलांचे भले व्हावे हा दृष्टीकोन समोर ठेवून हा निर्णय घेतेला आहे. तसेच जेवढ्या प्रमाणात गरज असेल तेवढ्याच प्रमाणात शाळाखोल्या दिल्या गेल्या पाहिजेत हे मान्य असून याबाबतीत बृहत आराखडा तयार करुन अन्हेल्दी कॉम्पिटिशन तयार होणार नाही, हेल्दी कॉम्पिटिशन तयार होईल याची दखल घेऊ. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत वारंवार हस्तक्षेप होतात. मी हे सांगू इच्छितो की, एखादी बाब चुकली असेल तर ती प्रशासनाने मान्य केली पाहिजे. शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत दळभद्री राजकारण होता कामा नये. कोणत्या तरी एखाद्या वर्तमानपत्रामध्ये एखादे वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे एकदम आग्रही भूमिका

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:50

(प्रा. वसंत पुरके...)

घेऊन सभागृहामध्ये गोंधळ घालणे योग्य नाही. शिक्षण ही महत्वाची बाब असल्यामुळे यावर होणारा खर्च आणखी जास्त झाला पाहिजे या मताचा मी देखील आहे.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मार्गिकेमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

प्रा.वसंत पुरके.....

सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, श्री.डायगव्हाणे किंवा माननीय सदस्य श्री.गडकरी असतील, त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ज्या शाळा अनुदानाच्या टप्प्यावर आल्या आहेत त्यांना अनुदान मिळणे गरजेचे होते म्हणून माननीय वित्तमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे आग्रही भूमिका घेऊन 100 कोटीची तरतूद केली आहे. ही तरतूद करीत असताना मागील तीन महिन्यापासून ज्या त्रुटी आहेत त्या पूर्ण करु आणि ज्या विविध तुकड्या आणि शाळा अनुदानित टप्प्यावर आल्या आहेत त्यांना 100 टक्के अनुदान देऊ. वेतनेतर अनुदानावर पहिल्यांदा जोर दिला जाईल.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मार्गिकेमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

सभापती महोदय, शाळाबाह्य मुलांचा प्रश्न हा देखील महत्वाचा आहे. 4,78,798 शाळाबाह्य मुलांचा प्रश्न हा आम्हाला भूषणावह नाही. लाखो मुले आज शाळांपासून वंचित आहेत. म्हणून शिक्षणाला आज चळवळीचे स्वरुप आले पाहिजे. यासाठी लोकप्रतिनिधी, शासन, प्रशासन, सर्वसामान्य जनता, पालक, पदाधिकारी यांनी शिक्षणाकडे जाणीवपूर्वक डोळसपणे बघणे गरजेचे आहे. जरी महाराष्ट्रामध्ये 5 ते 7 लाख शिक्षकांची पदे असली तरी त्यांनीही शिक्षण क्षेत्राच्या प्रगतीकडे डोळसपणे पाहणे ही त्यांची जबाबदारी आहे आणि या क्षेत्राकडे सर्वसामान्य लोकांनी देखील जागृतपणे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, शिक्षणाला ख-या अर्थाने गती द्यावयाची असेल तर स्वतंत्र स्वायत्त मंडळ निर्माण व्हावे व त्याद्वारे शिक्षण व्यवस्थेकडे ख-या अर्थाने लक्ष द्यावे अशी सूचना केली आहे. या सूचनेचे निश्चित पालन करु. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना माहिती असेल, 1947 चा कायदा आहे, त्या कायद्यामध्ये अनेक त्रुटी राहिल्या आहेत. म्हणून येत्या अधिवेशनामध्ये निश्चितच आम्ही कायद्यामध्ये सुधारणा करु. या कायद्यामध्ये कोणालाही सोडणार नाही. केवळ शिक्षक जबाबदार नाही. समाजाने सुध्दा जबाबदारीने वागावे ही शासनाची अपेक्षा आहे. शासन, प्रशासन, पदाधिकारी आणि पालक या चौघांही लोकांवर निश्चितच ख-या अर्थाने जबाबदारी सोपविणार आहोत. एवढेच नव्हे तर याठिकाणी ग्रंथालयाच्या संदर्भात देखील सूचना करण्यात आली. लेखन

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मार्गिकेमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके.....

आणि वाचन संस्कृती महाराष्ट्रामध्ये निर्माण व्हावी अशी सूचना केली आहे, त्या सूचनेचा आम्ही जरुर आदर करु. दिनांक 27.6.2006 रोजी वृध्दाश्रम निर्माण केले असे म्हटले. Man must be respected according to his merit. गुणवत्तेची कदर करणे, गुणवत्तेची बूज राखणे महत्वाचे आहे. म्हणून सामान्य माणसाला गुणवत्ता प्राप्त व्हावी, शिक्षण प्राप्त व्हावे म्हणून देशामध्ये एक तत्व निर्माण केले. गुणवत्तेचे शिक्षण राबविले जाईल अशी दखल घेतली आहे. महानगरपालिकांच्या शाळामध्ये होणारा खर्च कमी आहे, तो सुध्दा वाढविण्यासाठी महानगरपालिका आणि आम्ही स्वत: निश्चितच एकत्र बसू. त्यांची मागणी काय आहे याची दखल घेतली जाईल.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मार्गिकेमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सूचना केली की, 16-17 हजार शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. मी न्रमपणे सांगू इच्छितो की, परवा आम्ही 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामधून निश्चितच वेतनाचा प्रश्न सोडविला जाईल. याठिकाणी बोलत असताना आकडेवारीचा संदर्भ देऊन फार जादूगिरी आहे असे म्हटले गेले. सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रात काही चुकले असले तरी 31, 72, 268 मुले निरक्षर आढळली. ही आकडेवारी का देऊ नये? चुकले असेल परंतु अचूक आकडेवारी समोर यावी म्हणून प्रयत्न केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावेत यांनी सैनिकी शाळेचा प्रश्न उपस्थित केला. सैनिकी शाळा उपेक्षित असता कामा नये. त्या ठिकाणी चांगले एज्युकेशन मिळाले पाहिजे म्हणून संबंधितांची बैठक घेतली. याठिकाणी चार-पाच सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्याप्रमाणे सैनिकी शाळांच्या संदर्भात गुणवत्ताप्राप्त शिक्षण मिळावे म्हणून समिती गठित करु. शिक्षण क्षेत्रामधील शिक्षक बांधवांना माझी विनंती आहे. शिक्षक तयारी करुन जात नाहीत, दूरवरुन येणे-जाणे करतात, इतकेच नव्हे तर अनेकवेळा शाळेमध्ये एकूणच प्रक्रिया थांबली आहे असे दिसून आले, मुलांना कॉपी पुरविण्यामध्ये काही प्रमाणात शिक्षक बांधवांचा वाटा असतो ही बाब बरोबर नाही. विज्ञानाचे शिक्षण, गणिताचे पाढे याबाबत प्रगती दिसून आलेली नाही. परिणामी 1 ते 7 वी, 8 वी ते 10 वी इयत्तेमध्ये आवश्यक ते रिझल्ट मिळू शकत नाहीत. 8 ते 10 वी व 11 वी ते 12 वी हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्वाचे घटक आहेत. त्यांना न्याय देण्यासाठी म्हणून सर्व सन्माननीय

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य मार्गिकेमध्ये उभे राहून घोषणा देत असतात)

..3..

10-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) X.3

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम........... 13:55

प्रा.वसंत पुरके.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदस्यांना माझी विनंती आहे, आपल्याही उपस्थितीमध्ये ब-याच समित्या गठित केल्या आहेत, त्यामध्ये आपण आम्हाला मदत करावी. शिक्षकांची शाळेतील अनुपस्थिती वाढली होती, शिक्षकांकडे अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात येतात. ही सगळी कामे बाहेर काढून घ्यावी आणि निवडणूक व जनगणना ही दोनच कामे सोपवावीत असा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षकांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण झाली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांना सांगू इच्छितो की, 25 तारखेला प्रत्येक पदाधिकाऱ्याला वेळ दिली आहे, त्यावेळी मार्गदर्शक तत्वे तयार करुन निश्चितच लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेऊ. अनेक सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी आमुलाग्र सूचना केल्या आहेत. भारतीय राज्य घटनेचे जे प्रास्ताविक आहे ते शाळेंमध्ये वाचले गेले पाहिजे. त्याबाबत निश्चितच विचार करु. 12 वी च्या शाळा आहेत त्या चालू राहतील. सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांना सांगू इच्छितो की, शिक्षक शिक्षणाची सारी कामे करतात. परंतु त्या कामामध्ये त्यांनी इम्प्रूव्हमेंट केली पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधीपक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

प्रा. वसंत पुरके .......

शिक्षकांनी आपली गुणवत्ता विकसीत केली पाहिजे संपूर्ण समाज शिकला, शिक्षकांची गुणवत्ता वाढली तरच ख-या अर्थाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विकास होऊ शकेल, विद्यार्थी शिक्षीत होऊ शकतील. या ठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला व त्यावर सन्माननीय सदस्यांनी जे काही विचार व्यक्त केले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. तसेच निवेदनामध्ये ज्या काही त्रुटी राहिल्या असतील त्या निश्चितपणे दूर करण्यात येतील. तसेच न्यायालयाचा आदर करुन सहा महिन्याच्या आत रेकॉर्ड सादर केले जाईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**उपसभापती** : प्रस्तावावरील चर्चा संपलेली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची बैठक दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 2.00 ते 2.15 वाजे पर्यंत स्थगित झाली. )

-------------

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा

**सभापती** : विधानपरिषद नियम 266 (2) च्या तरतुदींना अनुसुरुन मी सभागृहाल असे कळवितो की, या सभागृहातील ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या सभागृहातील त्यांच्या जागेचा दिनांक 7 जुलै, 2006 रोजी मध्यान्हपूर्वीपासून राजीनामा दिलेला आहे, आणि तो मी स्वीकारलेला आहे.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री.हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मुंबई पदवीधर मतदार संघातर्फे डॉ.दीपक सावंत यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे. ते दुसऱ्यांदा या सदनामध्ये निवडून आले आहेत, त्याचे मी हार्दिक अभिनंदन करतो.

डॉ.दीपक सावंत यांनी शपथ घेतली.

--------------

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कोकण विभाग पदवीधर मतदार संघातर्फे श्री.संजय केळकर यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.संजय केळकर यांनी शपथ घेतली.

-----------

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मुंबई शिक्षक मतदार संघातर्फे श्री.कपिल पाटील यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.कपिल पाटील यांनी शपथ घेतली.

-------------

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नाशिक विभाग शिक्षक मतदार संघातर्फे श्री.दिलीपराव सोनवणे यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.दिलीपराव सोनवणे यांनी शपथ घेतली.

-----------------

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 व नियम 93 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी.**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, गुरुमुख जगवाणी, जगदीश गुप्ता, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री शांताराम करमळकर, प्रकाश शेंडगे, सागर मेघे, प्रतापराव सोनवणे यांनी 289 अन्वये या सभागृहाचे सर्व कामकाम तहकूब करावे व नियम 93 च्या सूचनेवर चर्चा करावी अशा पध्दतीचा जो प्रस्ताव दिलेला आहे, तो आपण दोन मिनिटात मांडावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल सकाळी काही अज्ञात समाजकंटकाने शिवाजी पार्कच्या दादर येथील स्व.माँ साहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाच्या चेहऱ्यावर चिखल फासून पुतळयाची विटंबना केली. याच मैदानाच्या कडेस असलेल्या गणेश मंदिरातील गणेशाची आणि मारुतीची मूर्ती उखडून टाकण्यात आली व तिची तोडफोड केली. त्याठिकाणी असलेल्या साईबाबांची प्रतिमाही चिखलात फेकून देण्यात आली. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, विटंबना करणा-या समाजकंटकांचा शोध सुरु असून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिलेले आहेत. तथापि, अद्यापपावेतो एकालाही अटक करण्यात आलेली नाही. उप मुख्यमंत्री यांनीही राज्यात अशांतता पसरविण्याचा समाजकंटकांचा डाव आहे, अशी स्पष्ट कबुली दिलेली आहे.

सभापती महोदय, या घटनेचे प्रतिसाद सर्व मुंबईभर उमटलेच, मुंबईतील दादर परिसरात, मुंबईच्या उप नगरांमध्येही याबाबतच्या प्रतिक्रिया स्वाभाविकपणे हया उमटणारच. माँ साहेबांना जे शिवसैनिक मातेसमान मानत होते, त्या माँ साहेबांच्या चेहऱ्यावर अशा प्रकरचा चिखल फेकणे, हे समाजकंटकाचे काम तर आहेच, परंतु या मागे फार मोठा कट आहे. या महाराष्ट्रामध्ये अशांतता पसरविण्याचा फार मोठा कट आहे. या राज्यात गेल्या महिना-दोन महिन्यांत ज्या घटना घडल्या, ती औरंगाबादमधील असेल, मालेगांवमधील असेल, भिवंडीमधील असेल, नागपूर संघ कार्यालयावरील हल्ल्याची घटना असेल या सर्व घटना एकमेकांशी संबंधित आहेत. त्या घटनांचा शेवटचा उद्रेक याठिकाणी केला आणि त्याच्या संतप्त प्रतिक्रिया नुसत्या विदर्भात व मराठवाडयातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रभर उमटल्या. आजही काही जिल्हयांमध्ये बंद पुकारलेला आहे. म्हणून या निमित्ताने आम्ही सरकारला इशारा देणार आहोत की, हा जो समाजकंटक आहे व ज्याला केरळी तरुणाने पाहिलेले आहे, त्या केरळी तरुणाने त्याला पाहिल्यानंतर त्या केरळी तरुणास मारहाण करण्यात आली.

(नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

जोपर्यन्त समाजकंटकाला पकडले जाणार नाही तोपर्यन्त या सभागृहाचे कामकाज चालणार नाही, अशा प्रकारचा इशारा या निमित्ताने देत आहे. म्हणून आजच्या सभागृहाचे कामकाज संपूर्णपणे थांबविले पाहिजे. महाराष्ट्रात काही शक्ती अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, काही राजकीय व्यक्ती प्रक्षोभक भाषण करुन वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासंदर्भात शासनाने तातडीने कारवाई करावयास पाहिजे म्हणून सभागृहाचे कामकाज थांबवावे, अशा प्रकारची मागणी मी या ठिकाणी करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

**सभापती** : नियम 93 अन्वये चर्चा करावी, अशा पध्दतीचाही प्रस्ताव आलेला आहे. तसेच, नियम 289 अन्वयेही प्रस्ताव आलेला आहे. नियम 93 अन्वये चर्चा घ्यावी, अशी विनंतीही केलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियम 289 चा प्रस्तावही दिलेला आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रस्ताव देण्याचा एकच उद्देश आहे की, महाराष्ट्रामधील सामाजिक परिस्थिती बदललेली आहे. अनेक प्रकारची संकटे या राज्यावर येत आहेत. या सर्व घटनांच्या पाठीमागे अतिरेकी संघटना आहेत अशा प्रकारचा खुलासा शासनाने केलेला आहे. याच पार्श्वभूमीवर काल सकाळी जी घटना घडली ती पहाटे शिवाजी पार्कसारख्या मध्यवस्तीमध्ये, ज्या परिसरात हजारो लोकांची ये-जा असते, तेथील क्रीडांगणावर हजारो खेळाडू येतात, ज्याच्या केंद्रस्थानी एक मंदिर आहे, ज्याच्या बाजूला पोलीस स्टेशन आहे, अशा ठिकाणी घडलेली आहे. अशा पार्श्वभूमीवरील जागेवर पहाटे साडेतीन ते चारच्या दरम्यान 3/4 माणसे जातात, त्या ठिकाणी असलेल्या गजाननाच्या मुर्तीची, हनुमंताच्या मुर्तीची विटंबना करतात, साईबाबांची फ्रेम डॅमेज करतात, मुळापासून उखडून टाकतात, उखडलेल्या मुर्ती चिखलात फेकतात. हे सर्व झाल्यानंतर तेथे जमा झालेला चिखल दोन्ही हातामध्ये घेऊन बाजुला असणा-या स्व.मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाच्या चेह-यावर फासतात. ही कृती काही साधीसुधी नाही.

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार...........

संपूर्ण महाराष्ट्रातील वातावरण बिघडून जावे, अशांतता निर्माण व्हावी, अशा प्रकारचा हेतू या पाठीमागे असावा. मुंबई शहर हे जास्तीत जास्त शांत शहर आहे, कोणत्याही परिस्थितीत शांतता मोडत नाही, अशी या शहराची खासियत आहे. गेल्या अनेक वर्षात या शहरात काही घडलेले नाही, अशी वस्तुस्थिती असतांना या मुंबई शहरात काही तरी घडावे या उद्देशाने जाणुनबुजून ही कृती केलेली आहे. खरे म्हणजे ज्यावेळी आम्ही त्या ठिकाणी जाऊन पोहोचलो त्यावेळी आम्हीही या घटनेचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. ही घटना का घडली ? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला असे वाटले की, केवळ स्व.मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाला चिखल फासण्यात आला आहे. परंतु, वस्तुस्थिती मात्र निराळी होती. गणेश मूर्ती, हनुमंत मूर्ती आणि साईबाबांची फ्रेम यांचीही नासधूस केलेली होती. हे कृत्य जाणुनबुजून मुंबई शहरात अशांतता माजावी या उद्देशाने केलेली आहे. या पाठीमागे कुणाचे हात आहेत ? हे शोधण्याचा खरे म्हणजे, पोलिसांनी तातडीने तपास करावयास हवा होता परंतु पोलिसांनी कोणतेही पाऊल उचलले नाही. त्या ठिकाणी असलेल्या व्यायाम शाळेमध्ये असलेला जो केरळीय तरुण आहे त्यांने नासधुस करणा-या गुंडांना पाहिले होते म्हणून त्यालाही मारहाण करण्यात आली आहे. त्या केरळीय मुलाने आम्हाला सांगितले की, 3/4 तरुण पहाटे आले होते. त्याने असेही सांगितले की, या तरुणांना माझ्यासमोर आणले तर मी त्यांना ओळखू शकतो एवढेच नव्हे तर मी त्यांचे वर्णनही करु शकतो. एवढा सगळा तपास लोकप्रतिनिधी करु शकतात, मग पोलिसांना ही माहिती का मिळू नये ? त्याचप्रमाणे केवळ स्व.मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाला चिखल फासला गेला आहे अशा प्रकारची माहिती मिडियाला देण्यात येत होती. मात्र वस्तुस्थिती तशी नव्हती, वस्तुस्थिती त्याहून निराळी होती. हा सगळा प्रकार आश्चर्यकारक आहे. अशा प्रकारे घडलेल्या घटनेवर पांघरुण घालून अतिरेकी कृती करणा-या गुंडांना पाठीशी घालावयाचे होते काय ? त्यामुळे मुंबई शहरातील वातावरण बिघडले आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MHM/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 14:30

श्री.मधुकर सरपोतदार .........

आपल्याला कल्पना आहे की, स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या विषयी शिवसैनिकांमध्ये आईची भावना आहे. ज्यांना आईची काळजी नसते ते आईची पर्वा करीत नाहीत. संपूर्ण जगामध्ये आई या संइ ोला निराळया प्रकारचा अर्थ आहे. सभापती महोदय, आईवर अशा प्रकारे हल्ले करण्याचे प्रयत्न होतात, ही गंभीर बाब आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये काल शिवसैनिकांच्या प्रतिक्रिया उमटल्या. आपल्याला देशाची संस्कृती जपावयाची असेल तर ज्या अतिरेकी संघटना आहेत त्यांचा बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे. भिवंडीमध्ये जी घटना घडली त्या घटनेमध्ये पोलिसांना मारहाण करण्यात आली. तेथील डी.सी.पी. रुग्णालयामध्ये ॲडमिट आहेत. डी.सी.पी. चे 6 दात पडले. ज्यांचा मृत्यू झाला त्यांना महाराष्ट्र शासनाने आर्थिक मदत दिली. याचा अर्थ महाराट्र शासनाने त्यांना प्रोत्साहन भत्ता दिला. महाराष्ट्र शासनाने याबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. असे निकम्मे सरकार महाराष्ट्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था राखू शकत नाही. म्हणून प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर चर्चा घ्यावी. जोपर्यंत गुन्हेगार पकडले जात नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करावे, अशी आमची मागणी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वस्तुस्थितीचे वर्णन केलेले आहे, त्याची मी पुनरावृत्ती करीत नाही. दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. ही घटना घडली त्याच्या बाजूला पोलीस चौकी होती. हा सेंसेटीव्ह परिसर आहे. सकाळी ही घटना घडली, त्यावेळी पोलीस काय करीत होते ? काही पोलीस चौक्यांमध्ये महिलांवर बलात्कार होतात. सरकारने राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची कशी वाट लावली याचे हे उदाहरण आहे. परवा ज्यांनी पोलिसांचे तुकडे केले त्यांना ताबडतोब एक लाख रुपये मिळाले. नाशिक जिल्हयातील श्री.गांगुर्डे नावाच्या पोलिसाचे तुकडे करण्यात आले. जेथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले तेथे एकही मंत्री किंवा अधिकारी गेले नाहीत. त्यांच्या कुटुंबियांना कोणत्याही प्रकारची मदत दिली गेली नाही. एकीकडे ज्या अराष्ट्रीय प्रवृत्ती आहेत त्या असे सांगत आहेत की, आम्ही पोलिसांवर गोळया इ ाडू अशा प्रकारचे वक्तव्य केले जात आहे अशांना व्होट बँक पॉलिटिक्ससाठी संरक्षण मिळत आहे. It is directly failure the Government. कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये सरकारला अपयश आलेले आहे. माननीय गृहमंत्री फक्त भाषण करतात.

...2/-

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MHM/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 14:30

श्री.नितीन गडकरी .........

त्यांचे बोलणे पोलीस, त्यांच्या पक्षातील लोक आणि बाहेरचे लोकही ऐकत नाहीत. हा प्रश्न पोपटासारखे शब्द बोलून सुटणार नाही. सभापती महोदय, या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळलेली आहे. ही जी घटना घडलेली आहे त्याला सरकार जबाबदार आहे, गृहमंत्री जबाबदार आहेत. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या घटना एकामागून एक घडत आहेत. या राज्यामध्ये बॉम्ब स्फोटाच्या घटना घडत आहेत. पाकिस्तान झिंदाबादचे नारे दिले जात आहेत.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

आणि त्या ठिकाणी ज्या मुलाला मारहाण केली गेली होती, त्यात त्याचा हात फ्रॅक्चर झाला आहे. त्या केरळी मुलाने सांगितले आहे की, ते लोक आले आणि त्यांनी असे असे केले. त्याने त्यांचे चेहरे, स्वभाव वगैरे सगळे काही पोलिसांना सांगितले आहे. यावरून हे अराष्ट्रीय प्रवृत्तीचे लोक आहेत, ज्यांचा संबंध पाकिस्तान धार्जिण्या संस्थांशी आहे. सभापती महोदय, एकीकडे या समाजामध्ये कायदा आणि सुव्यवस्था कोसळली आहे. अराष्ट्रीय प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत आणि दुर्दैवाने मतांसाठी लाचार झालेले हे सरकार अशा लोकांच्या बाबतीत काही ठोस कारवाई करण्याऐवजी बोटचेपे धोरण अवलंबित आहे. मतांसाठी हे सरकार आणि सरकार पक्षातील लोक इतके लाचार आणि स्वार्थी झाले आहेत की, हा देश खड्ड्यात गेला तरी त्याचे त्यांना काही वाटणार नाही. या देशामध्ये हिरवा फडकला तरी चालेल, पण आम्ही आमच्या खुर्चीवर टिकून राहू असे राजकारण करणारे हे सरकार आहे. सभापती महोदय, सेक्युलॅरिझम या शब्दाचा अर्थ लांगूनचालन, तुष्टीकरण एवढेच हे लोक समजतात आणि त्यातूनच हा प्रश्न निर्माण झालेला आहे. यामुळेच शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांनी एकत्रित येऊन माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे हे आमचे नेते आहेत आणि त्यांच्या पत्नी स्व. मीनाताई ठाकरे, ज्यांना सर्व शिवसैनिक 'आई'सारखे मानतात, माँ साहेबांच्या पुतळ्याची विटंबना केली गेली त्यावेळी तेथून जवळच पोलीस चौकी आहे तेथील पोलीस काय करीत होते ? ते झोपले होते का ? शिवाजी पार्क सारख्या मध्यवर्ती ठिकाणी अशी घटना घडते आणि त्यासंबंधात पोलीस काहीच दक्षता घेत नाहीत, त्याबाबत कोणतीही कारवाई करीत नाहीत हे बराबर नाही. या संदर्भात आमचे गृहमंत्री तर म्हणतात की, इतके पुतळे आहेत तर त्यांची व्यवस्था कोणी करायची ? तुमची त्याबद्दल काहीच जबाबदारी नाही का ? तसे असेल तर सगळे सोडून द्या, महाराष्ट्रामध्ये या एका घटनेमुळे एकच जनक्षोभ उसळलेला आहे. केवळ मुंबईतच नाही तर महाराष्ट्रभर, अकोला, अमरावती, बीड, नाशिक, नागपूर आदी भागामध्ये देखील याचा उद्रेक उसळला. पण तरीही पोलिसांनी द्वेषबुद्धीने शिवसैनिकांनाच झोडपले आणि पाकिस्तान धार्जिण्या अराष्ट्रीय प्रवृत्तीच्या लोकांच्या बाबतीत मात्र काहीही कारवाई करण्यास पोलीस तयार नाहीत. अशी या राज्यामध्ये एकंदर परिस्थिती आहे म्हणूनच आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून या संबंधात चर्चा आपण घ्यावी असा जो प्रस्ताव आमच्या नेत्यांनी दिला आहे तो आपण मान्य करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

...... डीडी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मलाही या संबंधात काही गोष्टी आपल्यापुढे सांगावयाच्या आहेत. ...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना मी दोन मिनिटे बोलण्यास परवानगी देतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्या घटनेतून महाराष्ट्र सारा पेटला आहे त्याबद्दल आपण मला दोन मिनिटे बोला अशी परवानगी दिली आहे त्याबद्दल मी आपणास प्रथमतः धन्यवाद देतो.

**सभापती** : मी आपल्याला इतकेच सांगतो की, आपले गटनेते श्री.मधुकर सरपोतदार यांना या संबंधात मी बोलण्याची परवानगी दिली होती आणि त्याप्रमाणे त्यांनी आपले विचार, भावना येथे मांडल्या आहेत. तरीही आपण बोलण्याची परवानगी मागितली असता ती मी आपल्याला दिली आहे.

श्री. दिवाकर रावते : त्याबद्दलच मी आपणास धन्यवाद दिले आहेत. गटनेते बोलले आहेत म्हणून मी बोलू नये असे आपणास वाटत असेल तर मी बोलत नाही. ..

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी जरा समजून घ्यावे ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मला 2 मिनिटे बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद दिले आहेत असे असतानाही अशा प्रकारे आपण मला बोलत असाल आणि तरीही मी ते ऐकून घ्यायचे काय ? आपण मला बोलण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणे मी बोलण्यास उभा राहिल्याबरोबर आपण अशा प्रकारे सुरूवात कशासाठी करता ? आपणास मी येथे बोलू नये असे वाटत असेल तर मी बोलू इच्छित नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, या सभागृहात मी आपल्याला सातत्याने बोलण्यास परवानगी देत असतो आणि आताही दिली आहे. केवळ आता परवानगी देताना मी आपणास एवढेच सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी 'गटनेता' म्हणून या विषयी आपले विचार, आपल्या भावना येथे मांडलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मला नुसते बोलण्यास परवानगी दिली आणि मी उभा राहिल्याबरोबर समोरच्या बाजूकडून जी टिंगल-टवाळी होते ती आम्ही सहन करावयाची काय ?

**सभापती** : खरे तर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी हे पथ्य पाळले पाहिजे की, आपण बोलत असताना अन्य कोणी कॉमेंटस् करू नयेत असे आपल्याला वाटते त्याप्रमाणेच इतर कोणी बोलत असताना आपल्याकडून देखील कॉमेंटस् होऊ नयेत.

( यानंतर श्री. सरफरे .... इइ 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आपण कृपया खाली बसावे...

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी याठिकाणी अत्यंत खेदाने आणि नम्रपणे माझ्या भावना मांडू इच्छितो. दुर्दैवाने राज्यामध्ये एवढी मोठी प्रक्षोभक घटना घडली असतांना आम्ही भावनांना किती आवर घालावयाचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. मुळात ही घटना सकाळी घडली आहे. पहिल्यांदा त्याठिकाणी मूर्त्या फोडल्या गेल्या, साईबाबांची तसबीर चिखलामध्ये फेकून दिली गेली. चिखलामध्ये फेकून देण्यात आलेली ही साईबाबांची तसबीर मी या सभागृहामध्ये कशी आणली असेन? या घटनेचा दुपारी दोन वाजेपर्यंत पोलिसांनी पंचनामा केला नाही. चिखलामध्ये फेकून देण्यात आलेली साईबाबांची तसबीर आपल्याला दाखविण्यासाठी मी याठिकाणी आणली आहे...

**सभापती** : माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, कोणतीही वस्तू सभागृहामध्ये न आणता ती माझ्या कार्यालयामध्ये दिली तर तिचा योग्य तो आदर राखला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्याकडून ही चूक झाली आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, सकाळी 3 वाजता घटना घडल्यानंतर दुपारी दोन-अडीच वाजेपर्यंत पोलिसांकडून पंचनामा करण्यात आलेला नाही. त्यामुळे पोलिसांचा या घटनेकडे पहाण्याचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. या राज्याचे माननीय गृहमंत्री म्हणाले होते की, पोलिसांवर फेकणाऱ्या दगडाला आम्ही शस्त्राने, गोळीने उत्तर देवू. सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर आम्ही आमच्या हाताने एकही दगड मारलेला नाही...

(माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत बसून बोलतात.)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत मी आपणास सांगू इच्छितो की, कुणीही मध्ये बोलावयाचे नाही असे मी सांगितले आहे. तेव्हा माननीय सदस्यांचे भाषण चालू असतांना आपण मध्ये बोलू नये.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कुठेही दगडफेक झाली नाही, लाठीचार्ज झालेला नाही, काहीही घडलेले नाही. त्या ठिकाणी मी स्वत: उभा होतो. असे असतांना श्री. जयस्वाल नावाच्या मुजोर पोलीस अधिकाऱ्याने जमावावर सरळ अश्रूधूराच्या नळकांडया फोडण्याचे आदेश



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

दिले. मी त्यांना त्यावेळी विचारले की, आपण हे कशासाठी करता? तरीसुध्दा माझ्यासमोर त्यांनी अश्रूधूराच्या नळकांडया फेकण्यास सांगितले. आबासाहेब मी तुम्हाला सांगू इच्छितो की, तुमच्या मुर्दाड पोलिसांनी आमच्यावर जी वस्तू फेकली तिची मुदत संपलेली आहे. या अश्रूधूराच्या नळकांडयाची एक्सपायरी डेट 2002 आहे. तुमच्या पोलिसांकडील शस्त्र साहित्य सुध्दा एक्सपायर झालेले आहे. काहीही कारण नसतांना पोलिसांनी जमावावर लाठीचार्ज करण्याचा प्रकार घडला. आणि म्हणून या संपूर्ण घटनेकडे बघण्याची शासनाची जी प्रवृत्ती आहे, त्यापध्दतीने हे सर्व घडत आले आहे. या महाराष्ट्रामध्ये अनेक आक्षेपार्ह घटना घडत आहेत. प्रामुख्याने त्यामध्ये भिवंडीची घडलेली घटना असेल, व महाराष्ट्रातील अन्य कोणतीही घटना असेल. शासनाकडून असे सांगण्यात आले की, हा पुतळा महानगरपालिकेने बसविला असल्यामुळे त्याच्याशी आमचा काही संबंध नाही. अशाप्रकारचे निर्लज्जपणे शासन उत्तर देणार असेल तर आम्ही याठिकाणी चर्चा कशासाठी करावयाची ? अत्यंत उद्विग्नपणे मी माझ्या भावना याठिकाणी नमूद करतो. सभापती महोदय, मी आपला नेहमी आदर, मान राखत आलो आहे. आपला अवमान करण्याचा आमचा हेतू नाही. आमच्याकडून काही चूक झाली तर आपण आम्हाला संभाळून घेता. परंतु कधी कधी अशा विचित्र घटना घडतात. आमच्या मॉ साहेबांच्या पुतळयाचा अनादर कोणताही शिवसैनिक सहन करणार नाही. त्याठिकाणी ज्या मूर्त्या तोडण्यात आल्या, त्यामुळे महाराष्ट्रातील, देशातील हिंदू जागा झाला तर त्याला मारणारे हे कोण? अशावेळी आम्ही धर्मांध ठरतो काय? सेक्युलरवादी, आतंकवादी यांचे तुम्ही तुष्टीकरण करता, यावर मी जास्त बोलणार नाही. ही चर्चा मान्य झाल्यावर मी जास्त वेळ बोलेन. माननीय गृहमंत्र्यांनी या सदनामध्ये सांगितले आहे की, कोर्टाचा निकाल विरुध्द लागल्यानंतर त्यावर अपिल करावयाचे असते. त्या जागेबाबतचा योग्य पुरावा आपणाकडे असेल तर तो आठ दिवसात आपण सादर करा असे माननीय गृहमंत्र्यांनी सांगितल्यानंतर श्री. अबू आझमी यांनी ती जागा आमची असो किंवा नसो त्या जागेवर आम्ही पोलीस चौकी बांधू देणार नाही असे सांगितले. त्यांनी अशाप्रकारे सरकारला आव्हान दिल्यानंतर या राज्याचे माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील हे श्री. अबू आझमी यांना क्लिनचिट देतात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.. 14:45

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

ही या सरकारची नपुंसकता आहे. या घडलेल्या प्रकरणाच्या संदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे. जोपर्यंत मूर्तीभंजन करणारे देशद्रोही सापडत नाही, तोपर्यन्त सभागृहामध्ये काम करण्याची आम्हाला इच्छा नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपला मुद्दा मांडत असताना, "सरकार नपुंसक आहे", असा शब्द प्रयोग वापरला. हे असंसदीय शब्द कामकाजामधून काढून टाकावे अशी विनंती आहे.

**सभापती** : ते शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : आदरणीय मॉ साहेबांना मानणारे शिवसेनेचे सन्माननीय सदस्य, भारतीय जनता पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य...

**सभापती** : आपल्याला बोलण्यासाठी एक मिनिटांचा वेळ दिलेला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : मी वेळेची मर्यादा पाळेन. आमच्या सगळयांचे प्रेरणास्थान असलेल्या मॉ साहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याचे सरकार संरक्षण करु शकत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या प्रकरणातील गुन्हेगार हे 24 तासाच्या आत पकडले गेले पाहिजेत, अशाप्रकारची मुदत आदरणीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सरकारला दिलेली आहे. असे असताना पोलीस अधिकाऱ्यांची कशी भूमिका असते हे आम्ही पाहिलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या या दहा पक्ष बदलून आलेल्या आहेत....

...(अडथळा).....

श्री.नितीन गडकरी : असे बोलणे आक्षेपार्ह आहे...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आक्षेपार्ह काय आहे ?

डॉ.नीलम गोऱ्हे : अनेक शिवसैनिकांनी आणि शिवसेनेच्या महिला कार्यकर्त्यांनी गावागावात आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. 24 तासाच्या आत गुन्हेगार सापडले नाहीत तर आम्हाला आमच्या कार्यकर्त्यांच्या भावना रोखणे अवघड होणार आहे. मॉ साहेब या आमच्या प्रेरणास्थान आहेत. अशाप्रकारची घटना घडलेली असताना, त्या बाजूचे सन्माननीय सदस्य कौरवांसारखे फिदीफिदी हसत आहेत.. हे सरकार गुन्हेगारांना पकडण्यासाठी कोणतीही उपाययोजना करत नाही. हा प्रश्न एका व्यक्तीचा नाही. शिवसेना आणि भारतीय जनता पक्षातर्फेच संपूर्ण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढें सुरु....

महाराष्ट्रामधील अनेक कार्यकत्यांचे मॉ साहेब मिनाताई ठाकरे या प्रेरणा स्थान आहेत. संपूर्ण् महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडालेला आहे, म्हणून या संदभात चर्चा करण्याची आपण परवानगी द्यावी अशी माझी विनंती आहे. जय महाराष्ट्र.

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि अन्य भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य, सन्माननीय श्री.मधुकर सरपोतदार आणि अन्य शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वयेव नियम 93 अन्वये दोन चर्चेचे प्रस्ताव देऊन आजचे कामकाज तहकूब करुन या विषयावर चचा घेण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. आजच्या सभागृहासमोरील कामकाजामध्ये या विषयाच्या अनुषंगाने कोणतेही कामकाज नाही. संसदीय लोकशाहीमध्ये प्रश्नोत्तराचा तास हा अतिशय महत्वाचा मानला जातो. म्हणून या दोन्ही प्रस्तावांना मान्यता न देता, मी प्रश्नोत्तराचा तास सुरु करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देण्यास सुरुवात करतात.)

--

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**बोर्डी नाला मध्यम प्रकल्पाचे बांधकाम**

**(1) * 17352 श्री. सुधाकर गणगणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक 13099 ला दिनांक 16 मार्च, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हयातील चांदूर बाजार तालुक्यात बोरगाव मोहना हया गावच्या वरच्या बाजूला अंदाजे 4126 हेक्टरची सिंचनक्षमता प्रदान करु शकणाऱ्या बोर्डी नाला मध्यम प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल 9 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्या दरम्यान प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाला सादर करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(2) खरे असल्यास उक्त प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता केव्हा प्रदान करण्यात आलेली आहे,

(3) मान्यता देण्यात आलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (1) होय.

(2) बोर्डी नाला मध्यम प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, या प्रश्नाला दिलेले उत्तर अत्यंत असमाधानकारक आहे. विदर्भातील बोर्डी नाला मध्यम प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता शासन किती दिवसांमध्ये देणार?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, बोर्डी नाला प्रकल्पाला 1 महिन्याच्या आत प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय मंत्रिमहोदयांनी 1 महिन्याच्या आत प्रशासकीय मान्यता देण्याचे आश्वासन दिलेले आहे. माझा असा प्रश्न आहे की, माननीय राष्ट्रपतींच्या आदेशाच्या विरोधात, माननीय राज्यपालांच्या निर्देशाच्या विरोधात नियोजन विभागाच्या आणि अर्थ विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांनी दुष्टपणाने कार्यवाही केली त्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केली जाईल काय ? प्रकल्प विदर्भातील असो किंवा मराठवाड्यातील असो, अनुशेष असेल तर त्याबाबत अधिकाऱ्यांनी दुष्टपणा करु नये अशा सूचना देण्यात येतील काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

ता.प्र.क्र. 17352....

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकल्पामध्ये उपसा सिचंन योजना असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे कोणतीही उपसा सिंचन योजना असेल तर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची परवानगी घेणे आवश्यक होते. या गोष्टीला वेळ लागल्याने विलंब झालेला आहे. कोणत्याही परिस्थिती एक महिन्याच्या आत ही प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

----

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

**सभापती** : सभागृहात कामकाज करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळें मी सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दु. 2.51 ते 3.05 पर्यंत स्थगित झाली )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**उपसभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटे स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 15.05 वाजता 10 मिनिटे स्थगित करण्यात आली.)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशा प्रकारची मागणी केली. ही मागणी केली असतानाही प्रश्नोत्तराचा तास पुकारला गेला आणि प्रश्नोत्तरे सुरु करण्याचा प्रयत्न झाला. मी पुन्हा विनंती करतो की, जोपर्यंत कालच्या घटनेतील आरोपी पकडले जात नाहीत तोपर्यंत या सभागृहाचे कामकाज चालू नये अशी आग्रहाची विनंती करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही सकाळी सदनाला आणि माननीय सभापतींना नियम 289 आणि इतर नोटीसच्या संदर्भात अशी विनंती केली होती की, आजचे दिवसभराचे कामकाज स्थगित करण्यात यावे. संपूर्ण महाराष्ट्रात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न ज्या देशद्रोही शक्ती करीत आहेत त्यांना प्रोत्साहन मिळू नये, शासनाला या प्रकरणात अधिक काम करण्याची संधी मिळावी, पोलिसांनी या कामात न्याय द्यावा, पोलिसांवर आणि पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ले झाले त्या संदर्भातील सगळे आरोपी पकडले जातील तेव्हा त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जावी यादृष्टीने शासनाला संधी मिळावी म्हणून आम्ही आजचे कामकाज स्थगित करावे असा प्रस्ताव मांडला होता. कालच्या प्रकरणातील आरोपींना अटक होईपर्यंत या सदनाचे कामकाज चालू देऊ नये अशा उद्देशाने प्रस्ताव मांडला होता. माझी शासनाला आणि सदनाला विनंती आहे की, शासनाने या प्रकरणातील तपासाचे प्रयत्न अधिक वाढवावे आणि देशामध्ये गोंधळ घालणाऱ्या अनेक शक्ती आहेत त्यांचा बंदोबस्त करुन बिमोड करण्यासाठी पावले उचलावीत. केवळ शाब्दिक फुगे फोडून चालणार नाही. प्रत्यक्ष कृती करुन जनतेसमोर कोणती कारवाई केली याचे ठोस उदाहरण सादर करावे यासाठी आजचे कामकाज स्थगित करावे अशी विनंती करतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सभापती महोदय, या सदनामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो विषय उपस्थित केला, या संदर्भात निश्चित स्वरुपात राज्य सरकारच्या वतीने ज्यांनी ही घटना घडविली किंवा घडविण्यामध्ये ज्यांचा हात असेल त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश आणि आश्वासन सुध्दा माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांनी दिलेले आहेत. ही गोष्ट खरी आहे की, काल जी घटना घडली ती अतिशय दुर्दैवी होती आणि त्या घटनेचा सर्वांनीच निषेध केला आहे. म्हणून या संदर्भात आज जो प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्यात आला, आजचे सभागृहाचे कामकाज होऊ नये आणि सरकारच्या वतीने जे कोणी गुन्हेगार असतील त्यांना तातडीने पकडून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशा प्रकारची मागणी आहे, निश्चितपणे राज्य सरकारच्या वतीने कसून तपास चालू आहे............

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील.....

या घटनेमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील, त्यांच्यावर शासन कडक कारवाई करणार आहे. यासंदर्भात माझी सर्वसन्माननीय सदस्यांना एवढीच विनंती आहे की, या माध्यमातून, राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती हिंसक वळण लागणार नाही यांची सर्वांनी खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणात जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असे अभिवचन शासनातर्फे देण्यात आलेले व त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती** : माननीय सभापतींच्या दालनात विरोधीपक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब, श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार तसेच अन्य सदस्यांसमवेत जो निर्णय झाला त्यामध्ये असे ठरले की, सन्माननीय विरोधी पक्षाने जी इच्छा व्यक्त केली, ही आपलीच नव्हे तर सर्व सदस्यांची, सभागृहाची आहे. आताच राज्यात ज्या एक-दोन घटना घडलेल्या आहेत त्या क्लेशदायक आहेत. स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या संदर्भात जी घटना घडलेली आहे ती निषेधार्ह अशीच आहे. माननीय सभापतींच्या दालनात मघाशी ठरल्या प्रमाणे आता सभागृहापुढील संपूर्ण कामकाज तहकूब करण्यात येत आहे. तसेच आजचे जे कामकाज आह, ते उद्या घेण्यात येईल. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, उद्या मगंगळवार, दिनांक 11 जुर्लै, 2006 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 21 मिनिटांनी, मंगळवार , दिनांक 11 जुलै, 2006 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यात स्थगित झाली.)

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही